सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. ०३ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नॅशनल हेराल्ड : सोनिया, राहुलसह ६ जणांना कोर्टाची नोटीस

नवी दिल्ली, ०२ मे : नॅशनल हेराल्ड मनी लॉंड्रिंग प्रकरणी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने आज, शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना नोटीस बजावली. यासोबतच इतर ६ जणांनादेखील नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ मे रोजी होणार आहे.



विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी सोनिया आणि राहुल गांधींसह सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. न्यायाधीश गोगणे म्हणाले की, सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्यांच्या आरोपपत्रात ज्यांची नावे दिली आहेत, त्यांना नोटीस बजावताना सुनावणी घेण्याचा अधिकार आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरण हे काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डचे मालक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांना ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात 'यंग इंडियनला दिलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाशी संबंधित आहे. एका इक्विटी व्यवहारात २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचा आरोप आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह काँग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला होता.

## रॉबर्ट वाड्राच्या विरोधात खटला दाखल

कानपूर, ०२ मे : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २६ हिंदूंचे टार्गेट किलिंग झाल्यानंतर आक्षेपार्ह विधान करणारे रॉबर्ट वाड्रा यांच्या विरोधात कानपूरचे राम नारायण सिंह यांनी सीजेएम कोर्टात अर्ज दाखल केलाय. रॉबर्ट हे काँग्रेस सरचिटणीस प्रियंका वाड्रांचे पती असून त्यांच्यावर समाजात द्वेष पसरवल्याचा आरोप आहे. तक्रारकर्ते राम नारायण सिंह यांचे वकील संजय मिश्रा म्हणाले की, न्यायालयाने पोलिसांकडून अहवाल मागवला आहे. पोलिस अहवाल आल्यानंतर, एफआयआर नोंदवायचा की नाही याचा निर्णय घेतला जाईल. गेल्या २२ एप्रिल रोजी हिंदू पर्यटकांच्या टार्गेट किलींगमध्ये कानपूरचे शुभम द्विवेदी यांनाही गोळ्या लागल्या होत्या. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कुटुंबाची भेट घेतली.

## हर हर महादेव! केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले

केदारनाथ : देवभूमी उत्तराखंडमधील केदारनाथ धामचे कपाट विधी पूजनासह आज, शुक्रवारी सकाळी ७ वाजल्यापासून भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री पुष्कर सिह धामी यांनी देखील उपस्थित राहून सर्वांना सर्व भक्तांना शुभेच्छा दिल्या.

पुजाऱ्यांनी ॐ नम् शिवाय मंत्रोच्चार करत आणि भाविकांच्या बम बम भोले या जयजयकारात आज, शुक्रवारी सकाळी केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले. गुरुवारी(दि.१) बाबा केदार यांची पंचमुखी पालखी केदारनाथ धामला पोहचली. केदारनाथाचं दर्शन करण्यासाठी जवळपास १५ हजाराहून अधिक भाविक तिथे दाखल झाले होते. मंदिराचे दरवाजे उघडले तेव्हा भक्तांच्या हर हर महादेवच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला.

केदारनाथ मंदिराचे कपाट उघडण्याच्या सोहळ्यासाठी मंदिराला १०८ क्विंटल फुलांनी भव्यप्रकारे सजवण्यात आले होते. गुरुवारी राज्याचे डीजीपी दीपम सेठ आणि अप्पर पोलीस महासंचालक वी मुरूगेशन यांनी श्री बद्रिनाथ आणि केदारनाथ धाम याठिकाणी पाहणी करत सुरक्षा व्यवस्था आणि अन्य तयारीचा आढावा घेतला. यंदा केदारनाथ यात्रेत गर्दीचं नियोजन करण्यासाठी टोकन व्यवस्था लागू करण्यात आली आहे. टोकन काऊंटर वाढवणे, पीए सिस्टममधून भक्तांची माहिती, स्क्रिनवर स्लॉट आणि नंबर जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एटीएस, पॅरा मिलिट्री दल हेदेखील सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे.

केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडण्याच्या काही वेळ आधी, राज्याचे मुख्यमंत्री पुष्कर धामी केदारनाथला पोहोचले. दरवाजे उघडताच, हेलिकॉप्टरमधून भाविकांवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी प्रथम दर्शन घेतले. धाममध्ये पंतप्रधान मोदींच्या नावाने पहिली पूजा करण्यात आली.

मोबाईलच्या वापरावर मनाई

केदारनाथ यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना गाईडलाईन्स जारी करण्यात आली आहे. केदारनाथ मंदिर परिसरात ३० मीटरमध्ये मोबाईलचा वापर करण्यास मनाई आहे.

## अयोध्येचं राम मंदिर सोन्याने मढवणार! मुख्य कलशासह सिंहासनावर लावणार सोने

अयोध्या : वर्षभरापूर्वी राम मंदिराच्या तळमजल्यावरील १४ दरवाज्यांवर सोने बसवण्यात आले होते. प्रत्येक दरवाजावर सुमारे ३ किलो सोने वापरले गेले आहे. त्यानंतर यंदा जून महिन्यात राम दरबाराचा अभिषेक करण्यात येणार असून मंदिर प्रशासन ३ दिवस हा उत्सव साजरा करण्याची तयारी करत आहे. या पार्श्वभूमीवर ट्रस्टने मंदिराचे काम हाती घेतले आहे. प्रभू श्री रामाचं सिंहासन आणि त्यांचं द्वार सोन्याचं असावं, अशी भाविकांची इच्छा असल्याने श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने राम मंदिर संपूर्णत: सोन्याने मढवणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मंदिर ट्रस्टने दिलेल्या माहितीनुसार, राम मंदिराच्या दरवाज्यांवर सोन्याचा मुलामा लावण्याचे काम पुन्हा सुरू झाले आहे. आता पहिल्या मजल्याच्या ६ दरवाज्यांवर १८ किलो सोन्याचा मुलामा चढवला जात आहे. प्रत्येक दरवाजावर ३ किलो सोने वापरले जाईल. मुख्य कलश आणि राम दरबाराच्या सिंहासनावरही सोने लावले जाईल. त्यावर ३ ते ४ किलो सोन्याचा मुलामा चढवला जाईल, असे सांगण्यात आले आहे. राम मंदिराचे दरवाजे महाराष्ट्रातील चंद्रपूर येथून आणलेल्या सागवान लाकडापासून बनवले आहेत. त्यावर प्रथम तांब्याचा थर लावण्यात आला. आता सोन्याचा थर लावण्यात आला आहे.

## आता १५०० नाही ३००० येणार! एप्रिल-मे महिन्याचा हप्ता एकत्र मिळणार

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजनेचा एप्रिल महिन्याचा हप्ता अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर म्हणजेच ३० एप्रिल २०२५ पर्यंत मिळणार अशा चर्चा सुरु होत्या. मात्र एप्रिल महिना उलटून २ दिवस झाले असले तरी अद्यापही महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींच्या खात्यात एप्रिल महिन्याचा हप्ता आला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा हप्ता कधी मिळणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. अशातच लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

मागील महिन्यात फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता एकाचवेळी देण्यात आला होता. त्याचप्रमाणे यावेळीही एप्रिल आणि मे महिन्याचा हप्ता एकाचवेळी देण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. परंतु एप्रिल आणि मे महिन्याचा हप्ता कोणत्या तारखेला देणार याबाबत आदिती तटकरे लवकरच घोषणा करतील, असा अंदाज वर्तवला जात आहे. त्यामुळे आता लाडक्या बहिणींचे मे महिन्याकडे लक्ष लागले आहे.

दरम्यान, महायुती सरकारने महिलांच्या आर्थिक दृष्टया सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत वार्षिक उत्पन्न २.५० लाखांहून कमी असणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. आतापर्यंत महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांना ९ हप्ते देण्यात आले आहेत. त्यानंतर आता लाडक्या बहिणींना एप्रिल आणि मे महिन्याचा हप्ता एकत्र मिळणार का आणि कधी मिळणार, हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

महायुती सरकारने लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर आम्ही महिलांना २१०० देऊ, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. तर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जाहिरनामा हा ५ वर्षांसाठी असतो. या काळात आम्ही लाडक्या बहिणींना कधीही २१०० रुपये देऊ, असे म्हटले होते. त्यामुळे २१०० रुपये कधी येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सरकारच्या नियमानुसार, एकाच व्यक्तीला वैयक्तिक लाभाच्या केवळ एका योजनेचा फायदा घेता येतो. पण मागील काही काळात अनेक महिला एकाचवेळी शेतकरी सन्मान निधी आणि लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले. या प्रकाराची सरकारने छाननी केली असून, ज्या महिला दोन्ही योजना घेतात त्यांना 'लाडकी बहीण' योजनेतून केवळ ५०० रुपयेच मिळतील, असा निर्णय घेतला आहे. या नव्या निर्णयामुळे सुमारे ८ लाख लाभार्थी महिलांवर परिणाम होणार आहे.

## संपूर्ण जग हादरणार! रशियाने ५३ वर्षांपूर्वी सोडलेला उपग्रह पृथ्वीवर आदळणार

नवी दिल्ली : जगाची चिंता वाढवणारी मोठी बातमी समोर आली आहे. रशियाने १९७२ साली शुक्र ग्रहासाठी पाठवलेला 'कोस्मस ४८२' नावाचा उपग्रह पृथ्वीवर अनियंत्रितपणे कोसळणार आहे, अशी माहिती समोर येत आहे. हा उपग्रह ५३ वर्षांपूर्वी रशियाने (आजचे रशिया) सोडला होता, परंतु रॉकेटमध्ये काहीतरी बिघाड झाल्यामुळे तो शुक्र ग्रहावर पोहोचू शकला नाही. त्यामुळे आता हा उपग्रह पृथ्वीवर कोसळण्याची मोठी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

कोस्मोस ४८२ हा उपग्रह १९७२ मध्ये सोव्हिएत युनियनने प्रक्षेपित केला होता. हा उपग्रह वेनरा या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत तयार करण्यात आला होता. या मोहिमेचा उद्देश शुक्र ग्रहाच्या पृष्टभागावरून डेटा गोळा करणं असा होता. हा उपग्रह वेनरा ८ चं सहकारी यान होतं. वेनरा ८ या यानाने जुलै १९७२ मध्ये शुक्र ग्रहाच्या पृष्टभागावर उतरून ५० मिनिटांपर्यंतचा डेटा पाठवला होता. मात्र कोस्मोस ४८२ आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचू शकलं नाही. तसेच त्याला अंतराळात घेऊन जाणाऱ्या सोयुझ रॉकेटच्या वरच्या भागात काही प्रमाणात बिघाड झाला. कोस्मोस ४८२ दोन भागात विभागलं गेलं असून त्यातील मुख्य भाग १९८१ मध्ये पृथ्वीच्या वातावरणात येऊन नष्ट झालं. मात्र दुसरा भाग पृथ्वीच्या एका अंडाकार कक्षेत अडकून फिरत राहिला.

## कर्नाटकमध्ये हिंदुत्ववादी नेता सुहास शेट्टीची चाकूने भोसकून केली हत्या

मंगळुरू : कर्नाटकमध्ये हिंदुत्ववादी नेता सुहास शेट्टीची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. ही घटना घडल्यापासून दक्षिण कन्नड जिल्ह्यातील मंगळुरूत तणावाचे वातावरण आहे. परिस्थितीचा अंदाज येताच कायदा - सुव्यवस्था राखण्यासाठी मंगळुरूतील पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.



सुहास शेट्टीची हत्या झाल्यानंतर उल्लालमधील फैझल, कोंचाडीमधील मोहम्मद लुकमान आणि कन्नूरच्या इरशादवर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात जखमी झालेल्यांवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. मंगळुरूचे पोलीस तपास करत आहेत.

सुहास शेट्टी यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी गुरुवारी रात्री उडुपी तालुक्यातील अथराडी येथे एका मुसलमान तरुणाची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हल्लेखोरांनी चालक अबू बक्करच्या ऑटोरिक्षाचा रस्ता अडवला. नंतर हल्लेखोरांनी तलवारी आणि बाटल्यांनी त्याच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. अबू बक्कर पळून गेला आणि हिरियाडका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हिरियाडका पोलीस ठाण्याने तात्काळ कारवाई करत दोघांनाही अटक केली. आरोपी सुशांत आणि संदेश पुजारी यांना अटक करण्यात आली आहे. हे प्रकरण एनआयएकडे सोपवावे अशी मागणी होत आहे.

सुहास शेट्टीच्या हत्येनंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनी बंद पुकारला आहे. यामुळे मंगळुरूत तणाव आहे. पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली आहे.

## पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्स कायमस्वरूपी बंद होण्याच्या उंबरठ्यावर?

कराची : भारताच्या एका निर्णयामुळे पाकिस्तानच्या राष्ट्रीय विमान कंपनीच्या भवितव्यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान दरम्यानचा तणाव चिघळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर भारताने ३० एप्रिलपासून पाकिस्तानसाठी आपले हवाई क्षेत्र बंद करण्याचा मोठा निर्णय घेतला. भारताच्या या पावलामुळे पाकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्स (PIA) या आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या कंपनीला आणखी अडचणीत टाकलं आहे.

PIA समोरील संकट गंभीर

पाकिस्तानने काही दिवसांपूर्वी भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले आकाशमार्ग




बंद केले होते. त्याचाच प्रतिउत्तर म्हणून भारतानेही पाकिस्तानसाठी हे पाऊल उचललं. या निर्णयामुळे PIA ला अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणांकरिता लांबचा मार्ग निवडावा लागत आहे. त्यामुळे प्रवासाचा कालावधी, इंधन खर्च आणि एकूणच ऑपरेशनचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

PIA ची क्वालालंपूर, सोल, ढाका, हनोई आणि बँकॉकसारख्या ठिकाणी जाणारी विमानं यापूर्वी भारताच्या हवाई क्षेत्रातून जात होती. आता त्यांना चीन, लाओस, थायलंडमार्गे लांबचा वळसा घ्यावा लागत आहे. त्यामुळे एकेकाळच्या प्रतिष्ठित PIA ची उड्डाणे बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत, असं तज्ज्ञांचं मत आहे.

उत्तर भागातली उड्डाणेही बंद

३० एप्रिल रोजी PIA ने गिलगिट, स्कार्दू आणि इतर उत्तर भागातील उड्डाणेही तात्पुरत्या स्वरूपात थांबवली आहेत. या भागात रस्तेमार्ग नीट विकसित नसल्याने लोक हवाई सेवांवर अवलंबून असतात. त्यामुळे प्रवाशांसोबतच मालवाहतूकही ठप्प झाली आहे. PIA कडून यासाठी कोणतंही अधिकृत कारण दिलं गेलेलं नाही, पण आर्थिक अडचणींमुळेच ही सेवा थांबवावी लागल्याचं समजतं.

खाजगीकरणाचा अयशस्वी प्रयत्न

PIA ला वाचवण्यासाठी पाकिस्तान सरकारकडून खाजगीकरणाचा प्रयत्न सुरू आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या पहिल्या बोलीत अपेक्षित किंमत मिळाली नाही. दुसऱ्यांदा प्रयत्न करूनही तो अयशस्वी ठरला. सरकारने गुंतवणूकदारांना १००% मालकी व पूर्ण नियंत्रण देण्याचं आश्वासन दिलं होतं, तरीही विश्वासाचा अभाव आणि वाढते भू-राजकीय धोके यामुळे कोणीच पुढे आलं नाही.

भारताच्या बंदीचा थेट परिणाम

PIA च्या एकूण ३०८ आंतरराष्ट्रीय उड्डाणांपैकी बहुतांश पश्चिम आशियात जात असले तरी आग्नेय आशियाच्या मार्गांवर बंदीचा थेट परिणाम झाला आहे. एकेकाळी आशियातील आघाडीची विमान कंपनी म्हणून ओळख असलेली PIA आता टिकवण्यासाठी धडपड करतेय. भारतीय हवाई क्षेत्र बंद झाल्याने ती आणखी अडचणीत सापडली आहे.

PIA चं भविष्य काय?

PIA ची वर्तमान आर्थिक परिस्थिती, सरकारच्या खाजगीकरणातील अपयश आणि भारताने लावलेली हवाई बंदी - या सगळ्यामुळे कंपनीचं अस्तित्व धोक्यात आलं आहे.

## राज्यातील जलसंपदा प्रकल्पास केंद्रशासन मदत करणार - केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील

### 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५' च्या समारोप

नगर दि.२ :- पुढील चार वर्षांत देशातील प्रत्येक गावात व शेतास पाणी देण्याचा संकल्प घेऊन केंद्र शासन काम करित असून राज्यात प्रस्तावित सुमारे एक लाख कोटींच्या जलसंपदा प्रकल्पास केंद्र शासन निश्चितपणे सर्वातोपरी मदत करेल, अशी ग्वाही केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांनी दिली.



लोणी येथे जलसंपदा विभागाच्यावतीने आयोजित 'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५' च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्यसभा सदस्य धनंजय महाडिक, आमदार मोनिका राजळे, आ.अमोल खताळ, आ.काशिनाथ दाते, आ.विक्रमसिंह पाचपुते, आ.विठ्ठलराव लंघे, आ.किरण लहामटे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव संजय बेलसरे, माजी मंत्री तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे विश्वस्त ध्रुव विखे आदी उपस्थित होते.

केंद्रीय जलशक्ती मंत्री श्री.पाटील म्हणाले, कॅच द रेन, रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसारख्या उपक्रमातून केंद्र शासन पाणी बचतीचे काम करित आहे. देश दुष्काळमुक्त झाला पाहिजे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जलशक्ती मंत्रालय विविध प्रकल्प राबवत आहे. गंगा, ब्रह्मपुत्रेचे वाहून जाणारे पाणी देशातील खालच्या भागांत आणण्याचा केंद्र शासनाचा विचार आहे. 'नल से जल' योजनेत देशात १६०० कोटींचे २० पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहेत. यातील एक प्रोजेक्ट महाराष्ट्रात राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाने सरदार सरोवरसारख्या अमृत सरोवरसारख्या योजना पूर्णत्वास नेल्या. देशाच्या सीमेपर्यंत पाणी पोहोचविण्याची व्यवस्था केली.

देशाला वार्षिक १ हजार १२० बीसीएम पाण्याची गरज असते. आपल्या धरण प्रकल्पांची क्षमता ७५० बीसीएम पाणी साठवण करण्याची आहे. त्यामुळे गावात, शेतीत चार बाय चारचे सहा फूट खोल खड्डे खोदून पाणी अडविले पाहिजे. एका खड्ड्याच्या माध्यमातून एका एकरात पाच ते आठ लाख लीटर पाणी साठविले जाते, असेही त्यांनी सांगितले.

श्री.पाटील म्हणाले, पाण्याचा अपव्यय होऊ नये. यासाठी तळागाळापर्यंत जनजागृती करण्याची गरज आहे. अधिकारी शासनाचा अविभाज्य भाग आहे. अधिकारी जेव्हा पाणी बचतीसाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न करतील, तेव्हा निश्चितच सकारात्मक परिणाम समाजावर झाल्याशिवाय राहणार नाही, त्यामुळे आपल्या विभागात निष्ठेने काम करा.

पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, नदी जोड प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळणार आहे. जलसंपदा राज्याचा महत्त्वपूर्ण विभाग आहे. क्षेत्रीय पातळीवरील कर्मचारी हा या विभागाचा कणा आहे. जल व्यवस्थापन पंधरवड्यात हा विभाग लोकांपर्यंत पोहोचलो. लोकांच्या सूचना लक्षात घेऊन आपल्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी केल्यास विभागाच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्यात पाच मोठे नदीजोड प्रकल्प उभे राहत आहेत.

अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांप्रती संवेदनशील राहिले पाहिजे. आपण मनोधैर्य ठेवून काम करा, शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात उत्कृष्ट काम करणारे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमापूर्वी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर यांनी महाराष्ट्रातील जलसंपदा प्रकल्पांबाबत केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसमोर सादरीकरण केले.

## जिल्ह्याच्या काही भागात ३ ते ६ मे दरम्यान पावसाचा हवामान अंदाज

### नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

अहिल्यानगर, दि. २- जिल्ह्याच्या काही भागात ३ ते ६ मे २०२५ या कालावधीत वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा व हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/ सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (डशश्रषळश) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### प्रिन्स इंग्लिश स्कूलचा महाराष्ट्र दिनी गौरव




**सेलू,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र दिनानिमित्त शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य आणि पंचायत समिती सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर स्पर्धेतील विजेत्या शाळांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या सोहळ्यात एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू यांना मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम पारितोषिक (२०२३-२४) आणि जिल्हास्तरीय द्वितीय पारितोषिक (२०२४-२५) मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच, शाळेतील मागील वर्षीच्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनी तनिष्का तेलभरे आणि क्षितिजा खजिने यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला अमितकुमार मुंडे (बीडीओ, सेलू), गजानन वाघमारे (उपशिक्षण अधिकारी, परभणी), उमेशकुमार राऊत (गटशिक्षणाधिकारी, सेलू), अमोल निकम (तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र शिक्षक संघ, सेलू), केंद्रप्रमुख चिकटे सर, जनार्धन कदम (नोडल अधिकारी, सेलू) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे यांनी शाळेचे प्राचार्य कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर आणि सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. हा सोहळा शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आणि विद्यार्थ्यांच्या यशाचा उत्सव ठरला.

### जिंतूरात वृक्ष दिंडीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित रहा- घुगे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** निसर्गाची शाळा व हस्ताक्षर प्रकाशन गृहाच्या




माध्यमातून वृक्षदिंडी ३ मे ला नर्सी नामदेव येथून निघत आहे.

शेतकरी, वृक्ष व संत साहित्याच्या जागृतीसाठी ३८ गावे आणि ४०० किमीचा पायी प्रवास करीत ही दिंडी पंढरपूर येथे जात आहे.

येलदरी येथे दिनांक ४ मे रविवारी सकाळी ९ वाजता आगमन होणार आहे. शेतकऱ्याचे प्रश्न, वाढत चाललेली तापमान, वृक्ष संदर्भात आपली मानसिकता या विषयावरती लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत कृतीयुक्त जनजागृतीची आवश्यकता आहे. हा हेतू डोळ्यासमोर ठेवून शेतकरी, नोकरदार, उच्चपदस्थ व साहित्यिक मित्र मिळून चारशे किलोमीटरचा पायी प्रवास करत आहेत. ही वृक्षदिंडी चार तारखेला येलदरी येथे दाखल होत आहे.

सकाळी १० वाजता जगताप अन्ना विद्यार्थी,युवक व शेतकरी यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन करणार आहेत,तरी विद्यार्थी,युवक व शेतकरी बंधूंनी या दिंडीचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

व या पवित्र यात्रेत सहभागी व्हा आणि निसर्गसेवेत आपले योगदान द्या! येताना सोबत दीर्घकाळ टिकणाऱ्या झाडांच्या बिया सोबत घेऊन या वृक्षदिंडी सोबत द्या । असे आवाहन वृक्ष दिंडीचे प्रमुख श्री अण्णासाहेब जगताप,गणेश कुऱ्हा,वृक्षप्रेमी के.सी.घुगे,प्रकाश चव्हाण,प्रशांत मुळी,प्रवीण भिसे,संतोष काकडे,भागवत कापुरे, रवींद्र वाघ, यांनी केले आहे.

### माजी विद्यार्थ्यांच्या विज्ञान साहित्य भेटीमूळे प्रयोग शाळेतील विज्ञान साहित्यात अधिक भर

**मानवत / प्रतिनिधी-** येथील नेताजी सुभाष शिक्षण संस्थेच्या नेताजी सुभाष विद्यालयातील प्रयोगशाळेचे नूतनीकरण आज दिनांक एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून आज दिनांक १ मै रोजी विद्यालयात सन २००२ मध्ये आपले शिक्षण पूर्ण केले आज त्या माजी विद्यार्थ्यांच्या सेवा भाव मदतीने विद्यालयाच्या प्रयोगशाळेचे नूतनीकरण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयजी लाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर सतीश डोंबरे उद्धवराव हरकाळ , तर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल चव्हाण डॉ. शिवराज नाईक या मान्यवरांच्या शुभहस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी गेट-टुगेदर वर खर्च न करता जवळपास ७० हजाराचे शैक्षणिक साहित्य विज्ञान साहित्य विद्यालयातील प्रयोग शाळेला भेट दिले. यावेळी त्यांचा सन्मान प्रमूख पाहूणे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय समारोप विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयजी लाड यांनी केला आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाशिव होगे यांनी केले. या प्रसंगी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सह सन २००२ मध्ये शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमानंतर सर्वांना अल्पोहाराचा कार्यक्रम ठेवण्यात आला.

यावेळी अनेकांनी आपल्या शैक्षणिक जिवनातील विचार मनोगतातून व्यक्त केले. तर शाळेच्या परिसरात पाऊल ठेवताच बालपणीच्या अनेक आठवणी जागृत झाल्या असल्याचे मत व्यक्त केले. शाळेमूळे व सरांच्या मार्गदर्शनामूळे हे कार्य आमच्या हातून शक्य झाले, शाळेच्या ऋणातून आम्ही अजन्म मूक्त होणार नसल्याचे विचार अनेकांनी आपल्या मनोगता मधून व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❏ दैनिक ❏ वेबसाईट ❏ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# परभणी जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करणार - पालकमंत्री

## महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण संपन्न



**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मी कटीबध्द आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग, ऊर्जा, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, युवकांना रोजगार या सर्व बाबींवर प्राधान्याने लक्ष देऊन जिल्ह्याचा विकास केला जाईल, अशी ग्वाही राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त येथील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी स्टेडीयमवर आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण हे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते पार पाडले. त्यावेळी शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आदींसह स्वातंत्र्य सैनिक, पदाधिकारी, पत्रकार, नागरिक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सर्व उपस्थितांना पालकमंत्री यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

आपल्या भाषणात प्रारंभी पालकमंत्री यांनी पहलगाम येथील निष्पाप पर्यटकांच्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निष्पाप लोकांचा बळी घेणाऱ्या आतंकवाद्यांना धडा शिकविण्याचा विडा उचलला आहे. यामध्ये संपूर्ण देश त्यांच्या पाठीमागे उभा राहिला आहे, असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री म्हणाल्या की, १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या लढ्यात अनेक हुतात्म्यांनी बलिदान दिले आणि मराठी भाषिक प्रदेश असलेले आपले महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. भारतीय संघराज्यातील एक प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राचे वेगळे महत्त्व आहे. आपल्या राज्याला स्वराज्याचे प्रणेते छत्रपती शिवाजी महाराज, सामाजिक सुधारणेचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले, सामाजिक समतेचा पाया रचणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह विविध समाजसुधारकांची वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. या सर्वांचे प्रेरक स्मरण करणे आणि त्या आदर्शांसोबत उज्वल वाटचाल करणे, हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन कामकाज सुधारणा कृती आराखड्यामध्ये आपल्या जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य केले आहे, याची खात्री असल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, राज्यशासन ८ मे पासून ''एक पाऊल थॅलेसीमिया मुक्तीकडे'' हे राज्यव्यापी अभियान राबविणार आहे. आपण सगळे मिळून या अभियानात सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करुयात, असे आवाहन करताना स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत आजपासून ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत ''कंपोस्ट खड्डा भरू आपले गाव स्वच्छ ठेऊ'' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. गावाची संपूर्ण स्वच्छता करणे आणि स्वच्छतेबाबतची जनजागृती हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तरी सर्व ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपले गाव स्वच्छ व सुंदर ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केली. पालकमंत्री म्हणाल्या की, परभणी हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना आहेत. त्याचा शेतकऱ्यांनी लाभ घेऊन शेती समृध्द करावी. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतंर्गत मागील दोन वर्षांत ६ हजार शेतकऱ्यांना १२ कोटी अनुदान अदा करण्यात आले आहे. राज्य शासनाने पर्यावरण पूरक सौर ऊर्जे वर भर दिला आहे. शेतकऱ्यांसाठी अखंडीत वीजपुरठ्याकरीता ''मागेल त्याला सौर कृषी पंप योजना'' राबविली जात आहे. या योजनेचा शेतकऱ्यांनी अवश्य लाभ घ्यावा. याशिवाय कृषीपंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांवरील रात्रीच्या वीज पुरवठयाचा ताण कमी करण्याकरीता ''मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'' ही एक राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. जिंतूर तालुक्यातील दुधगाव येथे या योजने अंतर्गत चार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दुधगाव, आसेगाव आणि कौडगाव येथील शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी सुरळीतपणे वीज पुरवठा मिळत आहे. हरित ऊर्जे साठी ''प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना'' ही सर्वांसाठीच राबविली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे ४९ शासकीय कार्यालयांना सोलर बसविण्यासाठी जिल्हा नियोजनमधून मंजूरी देण्यात आली आहे. यामुळे कार्यालयांच्या वीज देयकात बचत होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येकांनी देखील आपल्या घराच्या छतावर सोलार पॅनल बसवून सौर ऊर्जेचा वापर करावा. या योजनेचा लाभ घेण्यासाठी योजनेच्या संकेतस्थळावर जाऊन अवश्य नोंदणी करावी.

सेलु शहराला राज्यातील पहिली सोलार सिटी करण्याचा आमचा मानस आहे, यासाठी सेलुकरांनी या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा. नुकतेच परभणी येथील महावितरण मंडळ कार्यालयाच्या छतावर ३५ किलोवॅट क्षमतेचा सोलर रुफटॉप प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. हरित ऊर्जा निर्मिती करणारे राज्यातील हे पहिले मंडळ कार्यालय ठरले आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असणाऱ्या ''ॲग्रिस्टॅक योजने'' मध्ये सर्व शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, याद्वारे शेतीक्षेत्रात क्रांती येणार असून नियोजन व योजनांची अमलबजावणी सुकर होणार आहे, असे सांगून पालकमंत्री म्हणाल्या की, लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अनुषंगाने २८ एप्रिल रोजी पहिला ''सेवा हक्क दिन'' साजरा करण्यात आला. जिल्ह्यामध्ये मागील आर्थिक वर्षात ४ लाख ६१ हजार प्राप्त अर्जांपैकी ४ लाख ३६ हजार इतक्या म्हणजे ९५ टक्के सेवा प्रदान करण्यात आल्या.

परभणी जिल्ह्यात आरोग्याच्या सुविधा अधिक बळकट करण्यावर भर दिला जाईल, अशी ग्वाही देऊन त्या म्हणाल्या की, सेलु येथे नुकतेच सेवा संकल्प शिबीरा अंतर्गत महाआरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीराच्या माध्यमातून अनेक रुग्णांनी आरोग्य तपासण्या केल्या. जिल्हा रुग्णालयात नुकतेच एन्डोस्कोपी सेंटरचे लोकार्पण करण्यात आले आहे. मराठवाडयातील हे पहिले सेंटर असून या ठिकाणी अन्ननलिकेच्या आजाराचे त्वरीत निदान केले जाते. या रुग्णालयात या महिन्यात एमआरआय सेंटर आणि कॅथलॅबचीही सुविधाही सुरु करण्यात येणार आहे. रुग्णांच्या सेवेसाठी सेलू आणि पालम येथे डायलिसीस केंद्र सुरु करण्यात आले आहे. लवकरच पूर्णा, जिंतूर, गंगाखेड येथे मोफत डायलिसीसची सेवा सुविधा उपलब्ध होणार आहे. मोठ्या शस्त्रक्रियेमध्ये राज्यात व्दितीय क्रमांकावर आल्याबद्दल गंगाखेड येथील उपजिल्हा रुग्णालयाला गौरविण्यात आले आहे. परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे लवकरच माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात येणार आहे. अठरा महिन्यात या इमारतीचे काम पूर्ण केले जाईल.

शासनाच्या योजना तळागळापर्यंत नेण्यासाठी व त्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळण्याकरीता जिल्ह्यात ''पालकमंत्री टास्क फोर्स''च्या माध्यमातून विभागप्रमुखांना १०० गावे दत्तक देण्यात आली आहेत. येत्या पाच वर्षात सुमारे ५०० गावांचा या उपक्रमाच्या माध्यमातून कायापालट करण्यात येणार आहे. महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी लखपती दीदी योजना, महिलांची क्रेडीट सोसायटी यासारखे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. महिला बचतगटांनाही सक्षम केले जाईल. लखपती दीदी योजने अंतर्गत दोन लाखांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. ते एक वर्षातच पूर्ण केले जाईल. ''मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना'' बंद होणार नाही. त्यामुळे चिंता करु नये. परभणी जिल्ह्यातील सुमारे चार लाख पेक्षा जास्त महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ दिला जात आहे, असे त्यांनी सांगितले.

बालविवाह ही आपल्या समाजासमोरील एक गंभीर समस्या आहे. या समस्येविरुद्ध लढा देण्यासाठी परभणी जिल्हा परिषदेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेसाठी बालविवाहविषयी आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. आपण सर्वांनी ही माहिती वाचून इतरांपर्यंत पोहोचवावी आणि बालविवाहाची अनिष्ठ परंपरा थांबवावी, असे त्यांनी आवाहन केले.

पालकमंत्री म्हणाल्या की, जेष्ठ नागरिकांना जीवन सुकरपणे जगण्यासाठी ''मुख्यमंत्री वयोश्री योजने'' अंतर्गत जिल्ह्यातील १४ हजार १९२ वयोवृध्द लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रत्येकी तीन हजार रुपये अदा करण्यात आले आहेत. स्वत:च्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ अवश्य घ्यावा.

जिल्ह्याच्या क्रीडा विकासावरही भर दिला जात आहे. तरुणांना खेळासाठी जागा उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. पुर्णा, जिंतूर, सेलु व गंगाखेड येथील क्रीडा संकुल लवकरच कार्यान्वित होणार आहे. तर उर्वरित तालुक्यातही जलदगतीने क्रीडा संकुल उपलब्ध करुन दिले जातील. जिल्हा क्रीडा संकुलाचाही कायापालट केला जाईल. या ठिकाणी खेळाडुंसाठी अत्याधुनिक सूविधा उपलब्ध केल्या जातील. ''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत'' शासकीय व खाजगी अशा २३९ आस्थापनांवर सुमारे २ हजार २०५ प्रशिक्षणार्थीना काम करण्याची संधी देण्यात आली आहे.

## शॉर्ट सर्किटमुळे घराला भीषण आग; लेकीच्या लग्नासाठी ठेवलेली दीड लाखांची रोकड आणि घरसामान जळून खाक

### पिंपळगांव तांड येथे आगीने आर्थिक नुकसान



**जिंतूर,/प्रतिनिधी- :** जिंतूर तालुक्यातील पिंपळगांव तांडा येथे गुरुवार, ०१ मे रोजी सकाळी १० च्या सुमारास अचानक भीषण आग लागून एका कुटुंबाचे सुमारे दीड लाख रुपयांसह घरातील संसारोपयोगी साहित्यासह लेकीच्या लग्नासाठी साठवून ठेवलेली रोकड जळून खाक झाले आहे.

जिंतूर तालुक्यातील बहुतांश वाडी तांडा वस्ती मधील नागरिकांना हाताला काम नसल्याने ते कामासाठी मुंबई, पुणे सह इतर ठिकाणी कामासाठी सह कुटुंब गेलेले आहे असेच एक कुटुंबातील ग्रामस्थ नागरिक ज्ञानेश्वर भोपाजी राठोड हे घरमालक सध्या पुण्यात रोजंदारीवर असून, घटनेच्या वेळी संपूर्ण कुटुंब गावात नव्हते. त्यामुळे घरात कोणीच नसल्याने घराला कुलूप लावून घर बंद होतं सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. शॉर्ट सर्किट झाल्यानंतर घरातून धुराचे लोट निघू लागले. गावकऱ्यांनी धाव घेतली व अथक प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत घरातील सगळे संसार उपयोगी साहित्य, कपडे, धान्य, आणि मुलीच्या लग्नासाठी ठेवलेली रोख रक्कम देखील जळून खाक झाली सुदैवाने जीवितहानी झालेली नाही मात्र एका गरीब कुटुंबांचा आर्थिक, मानसिक झळ सोसावी लागली त्यामुळे शासनाने आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### भाजपाच्या त्या निर्णयाचे स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने देशात जातिनिहाय जनगणना करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत म्हणून भारतीय जनता पार्टी पारदेश्वर मंदिर मंडळच्या वतीने जिंतूर रोड येथे फटाके फोडून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी पारदेश्वर मंदिर मंडळ अध्यक्ष स्वप्नील पिंगळकर, भाजपा कार्यकारणी सदस्य मोहन कुलकर्णी, मधुकर गव्हाणे, माजी नगराध्यक्ष कमल किशोर अग्रवाल, बाळासाहेब जाधव, मनपा नगरसेवक सुनील देशमुख, ओबीसी मोर्चा प्रदेश सरचिटणीस प्रदीप तांदळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय कुलकर्णी, कायदा प्रकोष्ट जिल्हा संयोजक ॲड. गणेश जाधव, सुशील शर्मा, विश्वास कराळे पाटील, नितीन शुक्ला, स्वप्नील किटे, भगवान बेद्रे, युवा मोर्चा सरचिटणीस अनिल रेंगे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित राऊत, ॲड. हनुमंत सोमवंशी, कामगार मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य रोहित जगदाळे, संकेत मठपती, चैतन्य कोठेकर, माधव देशपांडे, सागर वाघमारे व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा.नामदेव लटपटे यांना एज्युकेटर अवॉर्ड

**गंगाखेड-** गंगाखेड येथील कै.



सौ.शेषाबाई सिताराम मुंडे महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.नामदेव कुंडलिकराव लटपटे यांना आयुष फाउंडेशनद्वारे दिल्या जाणारा राष्ट्रीय स्तरावरील एज्युकेटर अवॉर्ड-२०२५ मिळाला आहे.

हा अवॉर्ड प्रा.लटपटे यांनी दिलेल्या शैक्षणिक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून सामाजिक सेवा कार्याचा सन्मान असून.

प्रा.लटपटे यांनी आपल्या शैक्षणिक,संशोधन व सामाजिक कार्यातून आलेल्या अनुभवातून ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने शोध लिखाण केलं आहे. त्याबद्दल मित्रपरिवारातून अभिनंदन होत आहे.

## लवकरच जांभूळ बेटाचा कायापालट होणार- कांतराव देशमुख

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** दहा कोटींच्या निधीतून होणार जांभूळ बेटचा कायापालट खा. जाधव यांच्या विकास निधीतून तरतुद व कामाला सुरुवात

परभणी- जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण असणारे आणि पर्यटकांना नेहमीच साद घालणारे जांभुळबेट हे एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे या बेटाच्या विकासासाठी १० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली असून प्रत्यक्ष कामासही सुरुवात करण्यात आली आहे.



परभणी जिल्ह्यातील पालम आणि पूर्णा तालुक्यांना स्पर्श करून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या मध्यभागी असणारे हे बेट म्हणजे जैवविविधतेचा उत्तम असा नमुना होय. मध्यंतरीच्या काळात जांभूळ बेटाला पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे सर्व बाजूंनी नुकसान पोहोचले होते शिवाय बेटावर जांभळीची झाडे कमी होऊन वेड्या बाभळींचे जंगल माजले होते. पर्यटकांना तिथे पोहोचण्यासाठी कसलीही व्यवस्था नव्हती मात्र जांभुळबेट संवर्धन समितीने कृषिभूषण कांतराव काका झरीकर यांच्या पुढाकारातून जांभूळ बेटावर अनेक सुविधा निर्माण केल्या. दिग्रस बंधाऱ्यामुळे भरपूर पाण्याची साठवण होत असल्यामुळे बेटापर्यंत पोहोचण्याचा कसलाही मार्ग नव्हता तेव्हा जांभूळ बेट संवर्धन समितीने बोटीची व्यवस्था केली. बेटावरील मंदिरासमोर शेड, स्वच्छतागृह, झाडांची लागवड, ठिबक सिंचनाची व्यवस्था आदि सुविधा निर्माण केल्यामुळे पर्यटकांचा ओढा मागील चार वर्षापासून वाढला आहे. मागील चार वर्षांपासून नियमितपणे झेंडावंदनही बेटावर होत आहे. या बेटावर आणखी पर्यटकांसाठी सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी परभणीचे खासदार मा. संजय जाधव यांच्याकडे संवर्धन समिती व परिसरातील नागरिकांनी आवाहन केल्यामुळे मा. खासदार संजय जाधव यांनी आपल्या स्थानिक विकास निधीमधून सोमेश्वर ते जांभुळबेट हा मुख्य रस्ता तसेच जांभूळ बेटावर,पेव्हर ब्लॉक, स्वच्छतागृह, वृक्षारोपण, शेड आदि सुविधांसाठी दहा कोटी रुपयांच्या निधीची तरतुद केली असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. या विकास निधीतून मूलभूत सुविधा पर्यटकांसाठी निर्माण होतील आणि पर्यायाने पर्यटकांची पाऊले जांभूळ बेटाकडे निश्चित वळतील अशी आशा निर्माण झाली आहे.

## उसंतवाणी

१४९६

शिरच्छेद केला। मोदींच्या फोटोचा।
खेळ विकृतीचा। कॉंग्रेसींनी ॥१॥

'एक्स'वरती या। टीकेचा ये पूर।
संतापाचा धूर। धुसमसे ॥२॥

टीकेच्या या ऐसे। बूमरँग झाले।
डिलीटच केले। घाबरून ॥३॥

आधीच पेटले। सिंधूचे ते पाणी।
ओठी रडगाणी। पाकड्यांच्या ॥४॥

होता त्यांची कोंडी। आणीबाणी वेळ।
तेव्हा असा खेळ। कशासाठी? ॥५॥

देशद्रोही का हा। कॉंग्रेसचा मेंदू।
टीकेसाठी चेंडू। लूज दिला ॥६॥

कांत म्हणे यांना। तारतम्य नाही।
विकृतीच वाही। रक्तांतून ॥७॥




श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
३० एप्रिल २०२५

# वेरूळची भूमी प्रेरणा, नवचेतना देणारी

## जगद्गुरु शांतीगिरी महाराजः हिंदू युवा चेतना हुंकार सभा' संपन्न

खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ: हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्वज याच वेळच्या भूमीतील होते. त्यांच्या समाधी येथे असून त्या प्रेरणा देतात, चेतना निर्माण करतात. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्यांच्यामुळे सर्वजण स्वाभिमानाने हिंदू म्हणून जगत आहोत. याच वेरूळच्या भूमीमध्ये येळगंगेच्यातीरी जगद्गुरु जनार्दन स्वामी बिसा मंत्राची साधना केली. त्यामुळे वेरूळची ही भूमी तरुणांना नवचेतना देणारी आहे असे प्रतिपादन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी जी महाराज यांचे उत्तराधिकारी जगद्गुरु शांतिगिरी महाराज यांनी केले


शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या धर्म योद्धा संघाच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त अक्षय्यतृतीयेच्या दिवशी वेरूळ आश्रम (ता.रत्नपुर, जि.छत्रपती संभाजीनगर)येथे 'हिंदू युवा चेतना हुंकार सभा' संपन्न झाली. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर श्री १०८ महंत स्वामी जनेश्वरानंद महाराज, धर्मयोद्धा संघाचे अध्यक्ष ब्र.नागेश्वरानंद,आश्रमिय प्रवक्ते ब्र. विवेकानंद,स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार,विश्व हिंदू परिषद छत्रपती संभाजीनगरचे उप जिल्हामंत्री सुनील घोलप यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी धर्माचार्य दुर्गा देवी, संकल्प हिंदुराष्ट्र अभियानचे कार्यवाह कमलेश कटारीया, हिंदू जनजागृती समिती, अहिल्यानगरच्या संयोजिका प्रतीक्षा कोरगावकर, शिवप्रहार संघटनेचे अध्यक्ष सुरज आगे आदींनी मार्गदर्शन केले

यावेळी शांतिगिरी महाराज, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शस्त्र पूजन पार पडले. शिवा अंगुलगावकर यांनी प्रास्तविक केले तर ब्र.नागेश्वरानंद यांनी संघटनेची वाटचाल विशद केली. यावेळी राष्ट्रसेवा आणि धर्मकार्याच्या विचाराने प्रेरित झालेल्या तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर शिवशाहीर गणेश गलांडे पाटील यांनी पोवाडा सादर करून शिवविचारांचा जागर केला.

(सोहळ्याला जगद्गुरु शंकराचार्यांची उपस्थिती

२८ एप्रिल ते ५ मे दरम्यान वेरूळ येथे संपन्न होत असलेल्या ॐ जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याला जगद्गुरु शंकराचार्य नरेंद्रानंद सरस्वती (सुमेरुपीठ, वाराणसी) यांची उपस्थिती लाभली. यासह महानिर्वाणपिठाधीश्वर श्रीश्री. १००८ आचार्य श्री स्वामी विशोकानंद भारती (हरिद्वार), पंचदशनाम जुना आखाड्याचे प्रवक्ते महंत श्री स्वामी नारायणगिरीजी महाराज, महामंडलेश्वर आचार्य स्वामी श्री प्रणवानंद सरस्वती महाराज यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावत भाविकांना मार्गदर्शन केले.)





## संघ हीच जीवनगाथा

अलकः- (१०७) सहचित्तता

नमस्कार आज आपल्या संघ हीच जीवनगाथा याचा समारोप करू या. आज २०२५ साली संघाने १०० व्या वर्षात पदार्पण केले आहे. सर्वच सरसंघचालकांचे जीवन संघ हीच जीवन गाथा असेच होते.

आजही आहे. या सर्वांचीच असू आम्ही सुखाने पत्थर पायातील। मंदिर उभविणे हेच आमुचे शील ॥ अशीच सहचित्तता होती व आजही आहे. त्यांच्या अथक प्रयत्नातून आज हिंदू जागरणाचा प्रभाव गतीत दिसतो आहे. डॉक्टरांनी संघाच्या वटवृक्षाचे एकमात्र बीज पेरले, आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. आता उत्तम साधना करून पान- फांद्या- फुल आणि फळ याचा बहर आणू या. माननीय सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत म्हणतात त्यासाठी सर्वांनी एका स्थानावर एका विचाराने एकत्रित व्हा. एक स्वरात - एकमनाने बोला. एकाच ध्येयाने - एक मनाने- एक मताने प्रेरित व्हा. असा एकोपा अशी एकजूट सहचित्तता निर्माण करेल. अर्थात त्यासाठी सनातन / चिरपुरातन आणि नित्य नूतन यांनी एक साथ चालणे महत्त्वाचे आहे. सनातन शिवाय नित्य नूतन असेल तर ते कटी पतंग सारखे होईल. व नित्य नूतन शिवाय पुरातन असेल तर ते युगानुकूल- देशानुकूल होणार नाही. समजा मला उत्तरेकडे हिमालय पर्वतावर जायचे आहे तर मी फक्त उत्तर दिशेने चालून हिमालय गाठू शकत नाही. उलट मी प्रवासात अनेक वेळा दिशा बदलून हिमालय गाठू शकेल. असे विविध वाटेने एकत्र येऊन भारत मातेला परम वैभवी बनवू या. ही आहे संघाची शिकवण. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर - एक अनोळखी इसम वय अंदाजे पन्नास वर्षे हा रेल्वे स्टेशन मालटेकडी येथे प्लॅटफॉर्म नंबर दोन वर बेवारस स्थितीत मयत झाला, घटनास्थळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजया मेलफैदेवार व पोलीस कॉन्स्टेबल निलेवाड जाऊन पंचनामा केला असता मयताची ओळख पटविण्याचे मयता जवळ काहीही एक मिळून आले नाही. त्यामुळे मयताची ओळख पटू शकली नाही ,मयताचे वर्णन खालील प्रमाणे अनोळखी इसम व यंदाचे पन्नास वर्षे ,रंग काळा ,डोक्याचे केस काळीपांडे, कपाळ उंच, नाक सरळ ,बांधा सड पातळ, उंची पाच फूट पाच, इंच मिशी बारीक काळी पांढरी अंगात प्रिंटेड रंगाचे फुल बायाची शर्ट निळ्या रंगाची जीन्स अशी मयताचे वर्णन असून पुढील मिळताचा तपास प्रभारी अधिकारी यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजया मेलफेदेवार करीत आहेत, सदरील वर्णनाचा इसम ओळखीचा असल्यास त्यांनी रेल्वे पोलिसांची संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ बक्षीस वितरण समारंभ संपन्न





तभा वृत्तसेवा

गंगापूर :- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित जिल्हास्तरीय शिक्षकासाठी दर्जे दार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३मध्ये घेण्यात आली.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर यांनी आयोजित या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मौलाना आझाद संशोधन केंद्र छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी दि.३० रोजी पार पडला याप्रसंगी माननीय जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर , माननीय प्राचार्या श्रीमती सान्वी देशमुख जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर , माननीय श्रीमती अश्विनी लाटकर शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद माध्यमिक विभाग छत्रपती संभाजीनगर, माननीय डॉक्टर प्रकाश मांटे विभाग प्रमुख जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर व इतर अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातून जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय त्याचप्रमाणे तालुकास्तरावर प्रथम , द्वितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा प्रमाणपत्र एवं स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

गंगापूर शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गंगापूर या विद्यालयातील उच्च माध्यमिक शिक्षिका श्रीमती विजया कोंडीराम केकान (बडधे) यांनी इयत्ता अकरावी / बारावी गटातून मराठी विषयात उत्कृष्ट व्हिडिओ निर्मिती केल्याबद्दल जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक आला होता. त्याबद्दल त्यांचा प्रमाणपत्र , स्मृतिचिन्ह व रुपये आठ हजार देऊन सन्मान करण्यात आला .

विशेष म्हणजे श्रीमती केकान (बडधे) यांचे पती श्री अशोक देवराव बडधे (सहशिक्षक) माध्यमिक विद्यालय पिंपळगाव पांढरी यानाही तालुकास्तरावर इयत्ता पाचवी ते आठवी व इयत्ता नववी ते दहावी या दोन गटातून छत्रपती संभाजीनगर तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल त्यांचा प्रमाणपत्र , स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. बडधे दाम्पंत्याचा या यशाबद्दल शहरातील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३५१/२०२५

देवीदास एकनाथ डव्हान व इतर
विरूध्द
निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत पुर्णाबाई देविदास डव्हाण हि दि.१८/१२/२०२३ रोजी मौजे भिव धानोरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १) देवीदास एकनाथ डव्हान, रा. भिवधानोरा, ता.गंगापुर जि. औरंगाबाद २) हिराबाई गणेश जगदाळे, रा. जानेफाळ, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ३) विठठल देवीदास डव्हान, रा.भिवधानोरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदारांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.३०/०४/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## नथिंगच्या या सबब्रँडने तीन एअरबड्ससह सेकंड-जनरेशन स्मार्टफोन सादर केले

मुंबई: नथिंग या लंडनस्थित टेक्नॉलॉजी कंपनीच्या सीएमएफ या सबब्रँडने आज चार नव्या उत्पादनांची घोषणा केली. या ब्रँडतर्फे सीएमएफ फोन २ प्रो, बड्स २, बड्स २ प्लस आणि बड्स २ए ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत. नथिंगने या वर्षाची सुरुवात दमदार केली. काऊंटरपॉईंट रिसर्च क्यू१ २०२५ इंडिया स्मार्टफोन शिपमेंट अहवालानुसार या तिमाहीत हा ब्रँड भारतात सर्वाधिक वेगाने वाढणारा स्मार्टफोन ब्रँड आहे. या काळात ब्रँडने मागील वर्षीच्या तुलनेत लक्षणीय १५६ टक्के वाढ अनुभवली. सलग पाचव्या तिमाहीत नथिंगने सर्वाधिक वेगाने वाढणारा ब्रँड हे आपले स्थान कायम राखले आहे. या यशामुळे नथिंग हा भारतीय बाजारपेठेत मागील दशकभरात हे यश गाठणारा एकमेव ब्रँड ठरला आहे.

## विवो वाय१९ फाइव-जी लाँच केला

पुणे - जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने आज त्यांच्या वाय मालिकेतील एक नवीन स्मार्टफोन - विवो वाय१९ ५जी लाँच केला. या स्मार्टफोनमध्ये अनेक उत्तम वैशिष्ट्ये आहेत. इंद्रधनुष्य क्रिस्टल पोत आणि मेटॅलिक मॅट फिनिशमुळे त्याची रचना अत्यंत आकर्षक आहे. यात ५५०० एमएएच ब्लूव्होल्ट बॅटरी आहे, जी दीर्घकाळ टिकेल अशी बनवण्यात आली आहे. या फोनमध्ये एआय कॅमेरा आहे, जो फोटो काढणे सोपे करतो. हा फोन दैनंदिन वापरासाठी अत्यंत मजबूत आहे आणि त्यात आयपी ६४ धूळ आणि पाण्याचे प्रतिरोधक वैशिष्ट्य देखील आहे, ज्यामुळे तो धूळ आणि पाण्यापासून सुरक्षित राहतो. हा स्मार्टफोन तुमचा विश्वासू साथीदार बनण्यास सज्ज आहे.

## अनिश्चितता 'मुक्ती'वर भारी पडणार ?

पुणे : अमेरिकेने २ एप्रिल रोजी 'रेसिप्रोकल टॅरिफ'ची घोषणा केली होती, ज्याला त्यांनी 'लिबरेशन डे' (मुक्ती दिवस) असे संबोधले. मात्र नंतर हे टॅरिफ ९० दिवसांसाठी स्थगित करण्यात आले आणि भारतासह अनेक देशांना दिलासा देण्यात आला. तथापि चीनसोबत टॅरिफबाबतचा संघर्ष अजूनही सुरूच आहे. व्यापार धोरणांमधील अनिश्चिततेमुळे अमेरिकेच्या दीर्घकालीन ट्रेझरी यिल्डमध्ये वाढ झाली असून, अमेरिकी डॉलर कमकुवत झाला आहे. ही बाब विशेष आहे, कारण साधारणतः जोखीममुक्त परिस्थितीत डॉलर मजबूत होतो अशी अपेक्षा असते.

बंधन एएमसीचे उपाध्यक्ष व अर्थतज्ज्ञ श्रीजीत बालासुब्रमण्यम यांच्या मते, हे विविध घटकांमुळे घडत आहे.



जागतिक मालमत्ता वाटपातील बदल -अमेरिका व तिच्या धोरणांवरील विश्वासावर पुनर्विचार सुरू असून, गुंतवणूकदार अमेरिकन मालमत्तांपासून विविधीकरणाकडे झुकत आहेत. अमेरिकेवर जास्त भर देणारे डॉलर व्यवहार - मागील काही वर्षांत हे व्यवहार अतिशय जास्त प्रमाणात झाले आहेत.

कोविडनंतरची उच्च महागाई व तिचा परिणाम - महागाई अद्यापही २%च्या लक्ष्यापेक्षा वर आहे. फेड धोरणात यामुळे विकासाला दुय्यम स्थान मिळू शकते. त्यामुळे २००८ च्या आर्थिक संकटानंतर जसे दरकपात व भांडवली समर्थन झाले होते, तसे या वेळी होण्याची शक्यता कमी आहे.

बालासुब्रमण्यम पुढे म्हणतात की, अमेरिकी डॉलरमध्ये झालेली कमजोरी ही केवळ 'डी-डॉलरायझेशन'मुळे (जिथे डॉलरचे जागतिक चलन म्हणून स्थान कमी होते) झाली आहे का, की अन्य खोल कारणेही आहेत, हे पाहणे महत्त्वाचे आहे. अनेक परदेशी गुंतवणूकदार अजूनही यूएस इक्विटी आणि डॉलरवर अधिक भर देतात, जरी ही मालमत्ता खूप महागड्या ठरत असल्या तरीही. अमेरिकेच्या आर्थिक धोरणांमधील अनिश्चितता, कमी होत चाललेली आर्थिक वाढ व कॉर्पोरेट नफा, यामुळे गुंतवणूकदार अधिक सावध झाले आहेत. जेपीवाइ आणि सीएचएफसारख्या सुरक्षित चलनांमध्ये वाढ झाली आहे, तर जर्मन बाँड यिल्ड कमी झाल्या आहेत. जर अमेरिकन डॉलरची ही कमजोरी टिकून राहिली, तर ती भारतासारख्या उभरत्या बाजारांच्या चलन तणावांवर व आर्थिक स्थितीवर सकारात्मक परिणाम करू शकते.

शेवटी बालासुब्रमण्यम म्हणतात की, नियमांची स्थिरता, संस्थांची विश्वासार्हता व वाद निराकरण, यावर संशय निर्माण झाल्याने व्यवसायिक गुंतवणूक उद्दिष्टे कमी झाली आहेत. त्यामुळे अमेरिकी आर्थिक धोरणांभोवती निर्माण झालेली अनिश्चितता. जिथे एकीकडे वाढ कमी होते आणि दुसरीकडे महागाई वाढते. ही स्वतःच महागाई निर्माण करू शकते. यामुळे टॅरिफमुळे मिळणाऱ्या फायद्यांवर पाणी फिरू शकते. आजच्या घडीला हे दिसते आहे की,अनिश्चितता हीच मुक्तीवर भारी पडत आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८०/२०२५

चंद्रकांत दिगंबर ठोकळ व इतर
विरुध्द
निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे दिगंबर भानुदास ठोकळ दि.२९/११/२०१६ रोजी वृध्दापकाळामुळे मौजे सावखेडा, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ४ यांची जनकमाता नामे चंद्रभागाबाई भ्र. दिगंबर ठोकळ हि पण वृध्दापकाळामुळे मौजे सावखेडा, ता. गंगापुर येथे दि. २९/१०/२०२१ रोजी मृत्यु पावली आहे. अर्जदार नं. १) चंद्रकांत दिगंबर ठोकळ, रा.सावखेडा, ता. गंगापुर जि.औरंगाबाद २) शिवाजी दिगंबर ठोकळ, ह.मु. मोहटा देवी मंदिर, बजाजनगर, वडगाव कोल्हाटी, ता.जि. औरंगाबाद ३) शोभाबाई भ्र.विठठल राऊत, रा. कोळघर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) अलका भ्र. दत्तात्रय जाधव, रा. मांडवा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.पी.बी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.३०/०४/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## आईकू ने खास डील सादर केल्या

नवी दिल्ली : हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँड आईकू ने अमेज़न ग्रेट समर सेल २०२५ साठी उत्तम ऑफर्सची घोषणा केली आहे. ग्राहकांना आईकू ज़ेड९ लाइट, आईकू ज़ेड९ एक्स, आईकू ज़ेड९ एस, आईकू ज़ेड१० एक्स, आईकू ज़ेड१०, आईकू नियो १०आर, आईकू १२ आणि नवीन आईकू १३ सारख्या काही लोकप्रिय आईकू मॉडेल्सवर मोठ्या प्रमाणात सूट मिळू शकते. मुख्य सेल आज दुपारी १२ वाजता सुरू होत आहे, तर -रेप झीळाश सदस्यांना आज रात्री १२ वाजल्यापासून एक्सक्लुझिव्ह अर्ली ॲक्सेस मिळेल. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखले जाणारे, आईकू स्मार्टफोन्स अमेज़न वर सातत्याने सर्वाधिक रेटिंग असलेल्या ५ऋ डिव्हाइसेसमध्ये आहेत, ज्या वापरकर्त्यांकडून उच्च दर्जाचे रेटिंग मिळाले आहे.

## राज्याच्या आरोग्यसेवा परिवर्तनावर प्रकाश

मुंबई- प्रतिष्ठित राष्ट्रीय आयुष मिशन (एनएएम) कॉन्क्लेव्ह २०२५ आज महाराष्ट्रातील लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत सुरू झाले. या कॉन्क्लेव्हमध्ये भारतातील आयुष भागधारकांना एकत्र आणताना पारंपारिक आरोग्यसेवा प्रणालींना पुढे नेण्यात राज्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. दोन दिवसांचा हा कार्यक्रम पारंपारिक औषधांना मुख्य प्रवाहातील आरोग्यसेवेत एकत्रित करण्याच्या केंद्राच्या दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्राचे यजमान आणि आदर्श म्हणून स्थान अधोरेखित करतो. या कॉन्क्लेव्हचे उद्घाटन माननीय केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते राजस्थान, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, मिझोराम, सिक्कीम आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांमधील आरोग्यमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह झाले.

## इनोव्हा हायक्रॉसची एक्सक्लुझिव्ह एडिशन लाँच

बंगळुरू,२ मे २०२५: आपल्या कस्टमर फर्स्ट फिलॉसॉफीशी प्रामाणिक राहत टोयोटा किर्लोस्कर मोटर अर्थात टीकेएम ने आज इनोव्हा हायक्रॉसच्या झेडएक्स(ओ) ग्रेडमध्ये एक्सक्लुझिव्ह एडिशन लाँच केल. इनोव्हा हायक्रॉसच्या उल्लेखनीय यशानंतर, ही नवीन एडिशन खास स्टाइलिंग व आरामदायी केबिन अनुभवासह फीचर्स सादर करत आहे: देशभरातील लाखाहून अधिक ग्राहकांनी इनोव्हा हायक्रॉस वर विश्वास दाखवला असून, ही कार तिच्या आकर्षक स्टाईल व उत्कृष्ट कार्यक्षमतेने सर्वांना आकर्षित करत आहे.


## शिखर पहारिया यांनी आयपीएस अधिकारी बिरदेव धोणे यांच्या गावातील वाचनालय उपक्रमासाठी १,००० पुस्तके दान

छत्रपती संभाजीनगर - एका सशक्त पावित्र्यात, शिखर पहारिया यांनी नव्याने नियुक्त झालेल्या आयपीएस अधिकारी बिरदेव धोणे यांच्या प्रेरणादायी उपक्रमासाठी १,००० पुस्तके दान केली आहेत. हा उपक्रम त्यांच्या मूळ गावात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उभारण्याचा आहे. बिरदेव हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातून यूपीएससी उत्तीर्ण होणारे पहिले व्यक्ती आहेत.

अलीकडेच, बिरदेव यांनी बुके नव्हे, पुस्तके पाठवा असे आवाहन करत समाजमाध्यमांवर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती, जी देशभरात गाजली. या संदेशाने भारावून जाऊन, शिखर पहारिया यांनी शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा अनेक पुस्तकांची मोठी खेप गावाकडे पाठवली.

अतिशय साध्या पार्श्वभूमीतून आलेले बिरदेव यांनी २०२० ते २०२१ या काळात पोस्टमन म्हणून काम केले आणि त्याचवेळी यूपीएससीचा स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर ते दिल्लीला गेले, आर्थिक अडचणींशी झुंज दिली, पण हार न मानता मेहनत घेतली - आणि वयाच्या २७व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात आयपीएस झाले.

## ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे कामगार व महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोह



बिडकीन दि.२ - में पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच श्री.सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतीमेचे पुजन करून ध्वजारोहण करुन कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित सरपंच सलीम महंमद पठाण, ग्रामपंचायत अधिकारी .आशा तुपे उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,मीरा हाडे,गायत्री तुपे,कांचन बिडकर,मीना पवार,कोमल निकम,मीनाक्षी धुमाळ,जाधव सर,महाकाळे सर,शिवाजी गोरे अर्जुन मराठे, विष्णू धरपळे, नवनाथ धरपळे,रविंद्र गोरे,संजय धरपळे,अशोक गोरे,याकुब पठाण,लहु गोरे शब्बीर पठाण,अहेमद पठाण,लिंबाजी गोरे शौकत शेख, संदिप चाव्हरे,अब्बास पठाण दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने गावकरी आदींची उपस्थित होते.

## हारपिकने शाहरुख खानला केले आपला ब्रँड ॲम्बेसेडर

हारपिकने शाहरुख खानच्या साथीत हारपिक है ना ही नवीन मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमार्फत शौचालय स्वच्छतेच्या प्रत्येक पैलूमध्ये हारपिकची श्रेष्ठता अधोरेखित केली असून, प्रत्येक घरात उच्च दर्जाची स्वच्छता मिळवून देण्याचा विश्वास सुद्धा व्यक्त करण्यात आला आहे.



## केशरबाई नावकर यांचे निधन

सोयगाव,दि.२ मे - सोयगाव तालुक्यातील सावरखेडा येथील रहिवाशी केशरबाई शेंफडू नावकर (वय.८२) यांचे दि.२ मे शुक्रवार रोजी सकाळी ६:२५ वा.वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी २:०० वा.सावरखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे,असा परिवार आहे. ते तहसील कार्यालय सोयगाव येथील महसूल सेवक संजय नावकर यांच्या मातोश्री होत.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ४ थे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ३५२/२०२५ प्रकरणात पुढील तारीख ०४/०७/२०२५

अर्जदार - १) नंदाबाई भ्र. साहेबराव कुरकुटे वय ५६ वर्षे, धंदा घरकाम रा. नसीह मंदिर जवळ, नसीह कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) अनिता भ्र. राजेंद्र भोसले वय ३७ वर्षे, धंदा घरकाम रा. सोशल क्लब शेजारी, वार्ड क्रं. ७, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर ३) वंदना भ्र. शिवाजी मुठे वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा. मराठी शाळे जवळ, मुठेवडगांव, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर // विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ व ३ ह्या आपसात सख्या विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ व ३ यांचे वडील नामे साहेबराव यादवराव कुरकुटे हे दिनांक १४/०४/२०२५ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार क्रं. २ व ३ यांचे आजोबा नामे यादवराव सखाराम कुरकुटे व अर्जदार क्रं. १ ची सासु व अर्जदार क्रं. २ व ३ यांची आजी नामे इंदिराबाई यादवराव कुरकुटे हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत साहेबराव यादवराव कुरकुटे यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ ह्या विवाहीत मुली या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत साहेबराव यादवराव कुरकुटे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक ०२/०५/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून
दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, व.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क. ३५४/२०२५

अर्जदार :- १. जयवंताबाई भ्र. खंडेराव केरे, वय ७४ वर्षे, रा. गवळीशिवरा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २. बाळु पि. खंडेराव केरे, वय ४६ वर्ष, रा. वरील प्रमाणे ३. प्रकाश पि. खंडेराव केरे वय ४० वर्ष, वरील प्रमाणे, ४. लक्ष्मीबाई भ्र. विलास बोडखे, वय ५० वर्ष, रा. देभेगाव, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, ५. लताबाई भ्र. संजय गायके, वय ४१ वर्ष, रा. भिवगाव, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. बी.आर.राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार २ ते ५ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व इतर अर्जदारांचे वडील नामे खंडेराव पि. गिरजाबा केरे हे दिनांक २८/०२/२०२५ रोजी गवळीशिवरा ता. गंगापुर येथे मयत झाले असुन मयत खंडेराव यांचे आई वडील पुर्वीच मयत झालेले आहेत. मयत खंडेराव यांना अर्जदार हे एकमेव वारस असुन त्यांच्या शिवाय इतर कुणीही वारस नाहीत. अर्जदारांना मयत खंडेराव गिरजाबा केरे यांचे माहाराष्ट ग्रामीण बँक शाखा लासुर स्टेशन ता. गंगापुर या बँकेत बचत खाते क. ५५१२०००८६२९ हे असुन त्यामध्ये रक्कम रूपये ६,८३,२६८/ ऐवढी रक्कम असुन ती प्राप्त करण्या करीता अर्जदारांना सक्सेशन / वारस प्रमाणपत्राची गरज आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार सक्सेशन प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माइया सही व शिक्याने आज दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर

## अग्रलेख...

# वारसा संवर्धनातून विकास भरारी

कुठलेही सरकार सत्तेवर आले की त्या सरकारतर्फे ज्या अनेक घोषणा केल्या जातात, त्या घोषणांमध्ये संस्कृती आणि परंपरांची जपणूक आणि संवर्धनासाठी प्रयत्न करणार तसेच आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा जपण्यासाठी पावले उचलणार या घोषणांचा अग्रक्रमाने समावेश असतो. या घोषणा त्या त्या सरकारतर्फे सत्तेत येताच अहमहमिकेने केल्या जातात. तथापि, त्याबाबत भरीव असे काही होईलच याची काही शाश्वती नसते. अनेकदा तर सरकारच्या कार्यक्रम पत्रिकेवर इतके सारे विषय असतात की सांस्कृतिक, सामाजिक, आध्यात्मिक मुद्दे कुठेतरी धूळ खात पडून राहतात. रामजन्मभूमीचा मुद्दा असो, कृष्णजन्मभूमीचा असो, गुटख्यावरील बंदीचा असो, शंकरपट, दहीहंडी आणि जलीकट्टूच्या आयोजनाबाबतचा असो की शिवाजीची वाघनखे आणण्याचा, गडकिल्ले संवर्धनाचा अन् एखादा चित्रपट करमुक्त करण्याचा असो... या साऱ्या आपल्या प्राचीन वारशाशी संबंध जोडणाऱ्या विषयांकडे निरनिराळ्या सरकारांच्या झालेल्या दुर्लक्षामुळे समाजाचेही नुकसान झाल्याचा आणि आपसी सद्भावही दुभंगल्याचा अनुभव आपण घेतला आहे. त्या अर्थाने राज्यातील देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या त्रयींच्या सरकारने याबाबत केलेले काम समाधानकारक म्हणावे लागेल. नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची लंडनमध्ये लिलावात निघालेली ऐतिहासिक तलवार खरेदी करून राज्य शासनाने राज्याचा अनमोल ठेवा परत मिळविला आहे. यानिमित्ताने आपल्या मराठा साम्राज्यातील, आपल्या मराठी मुलुखातील (ज्यात अठरापगड जातींचा समावेश होतो), त्यांच्या साम्राज्याचा एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेवा आपल्या महाराष्ट्रात येणार आहे. यासाठी राज्य सरकारचे नेतृत्व करणारे तिन्ही पुढारी, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि संबंधित अधिकाऱ्यांचे अभिनंदन करायला हवे. कारण आम्ही केवळ बोलके सेनापती नसून, कर्ते सेनापती असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. ही तलवार अर्जित करण्यासाठी ४७.१५ लाख रुपये सरकार देणार आहे. या कृतीसाठी भोसले घराण्याचे वंशज राजे मुधोजी भोसले यांनी सरकारचे आभार मानले आहेत. सरकारने ही तलवार परत आणून महाराष्ट्र आणि भोसले राजघराण्याच्या अस्मितेच्या रक्षणाचीच भूमिका पार पाडली आहे. रघुजी भोसले हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार होते. त्यांची युद्धनीती आणि शौर्य यावर प्रसन्न होत छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी दिली होती. रघुजी भोसले यांनी १७४५ च्या दशकात बंगालच्या नवाबांविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करीत मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता. दक्षिण भारतात सुद्धा त्यांनी आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला होता. पुरीतील जगन्नाथ मंदिराला भेट दिल्यानंतर, रघुजी भोसले यांनी यात्रेचे महत्त्व ओळखून, त्यास अधिक प्रसिद्ध आणि प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्याच प्रयत्नांमुळे, जगन्नाथ रथयात्रा अधिक प्रसिद्ध झाली आणि लोकांना यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

रघुजी भोसलेंची जी तलवार महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणार आहे, ती तलवार मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकधारी पाते, सोन्याचे नक्षीकाम हे त्या तलवारीचे वैशिष्ट्य आहे. युरोपीय बनावटीचे पाते हे त्या काळात प्रसिद्ध होते. या पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिले आहे. १८१७ मध्ये नागपुरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली होती. त्यात ही तलवार पळवून नेली असावी, असा जाणकरांचा अंदाज आहे. राज्याचा समृद्ध वारसा जतन आणि समृद्ध करण्यासाठी राज्याचे तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आणि जगदंबा तलवार ब्रिटनमधून भारतात आणण्यासाठी पुढाकार घेतला होता. लंडनस्थित मराठी उद्योजक त्यासाठी पुढे सरसावले. यातून महाराजांची वाघनखे भारतात आली आणि सध्या ती राज्यातील विविध संग्रहालयांत लोकांना बघता यावी म्हणून प्रदर्शनात ठेवली जात आहेत. त्यांचा हा प्रयत्नही केंद्र आणि राज्य शासनाच्या वारसा जतनाच्या घेतलेल्या संकल्पाचाच एक भाग होता. यापुढचा भाग म्हणून ही वाघनखे आणि जगदंबा तलवार कायमस्वरूपी भारताच्या ताब्यात यावी म्हणून ब्रिटिश शासनाला मोठ्या प्रमाणात पत्रे लिहिली जाणार आहेत. देशाचा समृद्ध वारसा काय आहे, याची जाणीव आजच्या पिढीला आहे. पण हा ठेवा तरुण आणि किशोरवयीन पिढीपर्यंत नेण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठीच विविध राज्य सरकारे आणि केंद्र सरकारचे प्रयत्न चाललेले आहेत. हजारो वर्षांपासून चालत आलेला आपला समृद्ध ऐतिहासिक वारसा जपण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारत आणि अमेरिका या देशांमध्ये सांस्कृतिक संपदा करार झाल्याची माहिती आपल्याला आहेच. या कराराअंतर्गत अमेरिकेतून तब्बल ५८८ प्राचीन कलाकृती भारतात परत आणण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे त्यापैकी २९७ कलाकृती या केवळ २०२४ या एका वर्षात आणण्यात आल्या. प्राचीन कलाकृतींची तस्करी रोखण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरले. सरकारी आकडेवारीनुसार, १९७६ ते २०१३ दरम्यान भारताने वेगवेगळ्या देशांमधून फक्त १३ पुरातन वस्तू परत मिळवल्या आहेत. तथापि, २०१४ मध्ये, जेव्हापासून नरेंद्र मोदी सत्तेत आले तेव्हापासून आणि २०२१ मध्ये २०० हून अधिक पुरातन वस्तू परत आल्या आहेत किंवा परत आणण्याच्या प्रक्रियेत आहेत. २००४ ते २०१४ या कालावधीत निवडक प्राचीन वस्तू अमेरिकेतून भारतात परत आल्या. मोदी सरकारने चार दशकांपूर्वीच्या तुलनेत जास्त प्राचीन भारतीय खजिना परत आणला आहे. ज्या वस्तू भारतात आणण्यात आल्या त्या ११ व्या इ.स. ते १४ व्या इ.स. या काळातील आहेत. तसेच २००० इ.स.पू. मधील तांब्याच्या मानवरूपी वस्तू किंवा दुसऱ्या इ.स.मधील टेराकोटा फुलदाण्यासारख्या ऐतिहासिक पुरातन वस्तू परत आणण्यातही ते यशस्वी ठरले आहेत. सुमारे ४५ पुरातन वस्तू सामान्य युगापूर्वीच्या आहेत. कांस्य संग्रहात प्रामुख्याने लक्ष्मी नारायण, बुद्ध, विष्णू, शिव पार्वती आणि २४ जैन तीर्थंकर, कंकलमूर्ती, ब्राह्मी आणि नंदिकेसा यांच्या सुप्रसिद्ध आसनांच्या अलंकृत मूर्ती तसेच इतर अनामित देवता आणि दैवी व्यक्तिरेखा आहेत.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि राष्ट्रीय संग्रहालयाची स्थापना प्राचीन स्थळांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी झाली आहे. यासाठी मोदी सरकारच्या काळात मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याच सरकारच्या कार्यकाळात काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक (उज्जैन), राम मंदिर (अयोध्या) सारख्या धार्मिक स्थळांचे नूतनीकरण झाले. सिंधू सभ्यता संग्रहालयाच्या (धोलावीरा, गुजरात) उभारणीसही चालना मिळाली आहे. केंद्राच्या याच प्रयत्नांचा भाग म्हणून युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारतातील स्थळे जास्त प्रमाणात समाविष्ट होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पंतप्रधानांनी तर भारतात समृद्धीचा ओघ वाढावा आणि सुदूर गावांमधील अर्थकारणाला गती यावी म्हणून धनवंतांना त्यांच्या परिवारातील विवाह विदेशात न करता देशातील विविध शहरांमध्ये करण्याचे आवाहन केले असून, त्यांच्या आवाहनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसादही मिळत आहे. काळाची पावले ओळखून भारताचा सांस्कृतिक डिजिटल डेटाबेस तयार करणे, ग्रंथांचे स्कॅनिंग व साठवण करणे या कामांनाही गती आली आहे. दिल्लीतील प्रधानमंत्री संग्रहालयाला देण्यात आलेले नवे रूप हा त्याच प्रयत्नांचा पुढचा भाग आहे. आता या संग्रहालयात आजवर झालेल्या पंतप्रधानांनी केलेली कामगिरी एकाच छताखाली बघण्याची आणि त्याचा अभ्यास, विश्लेषण करण्याची सोय झाली आहे. आदिवासी संग्रहालयांची नव्याने उभारणी करण्याचेही काम हाती घेण्यात आले आहे. उपलब्ध झालेल्या या वारशाच्या संवर्धनातून नव्या पिढीने देशाच्या, पर्यायाने आपल्या समाजाच्या विकासासाठी भरारी घेण्याची आवश्यकता आहे.

# पूज्य मां की अर्चना का एक छोटा उपकरण हूं!

## श्रद्धांजली

-किशोर पौनीकर नर्मदापुरकर, नागपूर

अभाविप विदर्भ प्रदेश व भाजपाचे प्रमुख कार्यकर्ते माजी आमदार स्व. रामदास आंबटकरांना भावपूर्ण श्रद्धांजली. बहुदा ते १९८६ हे वर्ष होते. शुभांग गोरे नागपुरला पूर्णकालिक होते व ते आता व्यक्तिगत जीवनात वापस जाणार होते. विद्यार्थी परिषद कार्यालयात त्यांचा निरोप समारंभ सुरु होता.


एका सुरेल गळ्याच्या कार्यकर्त्याने असु अम्ही सुखाने पत्थर पायातील , हे बापु महाशब्देंने रचलेले गीत गायले. उपस्थित बहुतेक साऱ्यांचेच डोळे पाणावले होते. कार्यक्रम आटोपला व मी उपस्थित कार्यकर्त्यांना बाजूला सारत त्या ज्येष्ठ कार्यकर्त्याजवळ गेलो व त्यांचा परिचय करून घेतला. मी रामदास भगवानजी आंबटकर, अमरावती विभाग संघटनमंत्री आहे. केंद्र अमरावती व गाव वडनेर! माझ्यासारख्या अगदी नवख्या कार्यकर्त्यालाही त्यांनी आपला परिपूर्ण परिचय करून दिला होता. तेंव्हापासून रामदास आंबटकर, रामदासजी या नावाने माझ्या ह्रदयात विराजमान झाले. १९८६ च्या विदर्भ प्रांताच्या वर्धा अधिवेशनात रामदासजी विदर्भ प्रदेश मंत्री झाले. त्यानंतर त्यांच्या नागपूर प्रवासा दरम्यान नित्यभेटी सुरू झाल्या. पुढे नागपूर नगर संघटनमंत्री असलेली अमरावतीची कार्यकर्ती मनिषा बक्षी पण पूर्णकालिक कार्यकाल आटोपून व्यक्तिगत जीवनात जातांना तिचा निरोप समारंभ झाला. त्या कार्यक्रमात रामदासजींनी पुज्य मां की अर्चना का एक छोटा उपकरण हूं! हे गीत गायले होते. रामदासजींचा सुरेल गळा व त्यांच्या घराण्यातील पूर्व परंपरेचे देशभक्तीपर स्पंदनं उपस्थितांना भारतमातेच्या सगुण रुपाचे दर्शन घडवत असे. पुढे यवतमाळ अभ्यासवर्गात रामदासजी प्रांत संघटनमंत्री बनले व त्यांचे केंद्र नागपूर झाले. त्यांच्या विदर्भ प्रांत प्रवासात महिनाभरात अंदाजे दोनदा तरी विस्तृत भेटी होत असत. आमच्याकडे किमान चार पिढ्यांपासून पैठणच्या श्रीएकनाथ महाराजांची पुण्यतिथी एकनाथ षष्ठी असते. यात रात्रभर जागृती भजन असते. रामदासजींना भजनाची आवड असल्याने मी त्यांना भजनासाठी बोलवले. पहिल्यावर्षी त्यांनी आर्ततेने म्हटलेला, बाऽरे पांडुरंगा केंव्हा भेट देसी। झालो मी परदेसी तुजविण... हा अभंग अजूनही कानात घोळत आहे. नंतर दरवर्षीच ते नाथषष्ठी उत्सवात हजरी लावत असत. एरव्ही नागपूर प्रवासा दरम्यान कधी दुपारी घरी जेवायला आले की म्हणायचे, किशोर, जरा पेटी काढ बरं! असे म्हणून दोन चार अभंग म्हणत.

रामदासजी नागपूरच्या संगमचाळ कार्यालयात एकटे दिसले की त्यांना एखादे गीत म्हणण्याचा आग्रह करण्याचा जणू मला छंदच लागला होता. रामदासजी विदर्भ प्रांत संघटनमंत्री आहेत म्हणजे काय आहे? हेच मला त्याकाळी कळत नव्हते.... याला एक महत्वाचे कारणही होते. ते म्हणजे रामदासजींची अगदी साधी राहणी.

मी पूर्णकालिक कार्यकर्ता आहे, मी विदर्भ प्रांत संघटनमंत्री आहे, असा कुठलाही अभिनिवेश त्यांच्या वागणुकीत नसे. थोडे धैर्याने व माफी मागून म्हणतो की रामदासजींच्या काळातील अभाविप संघटनेतील मोकळेपणा त्यानंतर कधी दिसलाच नाही. कुठेही अधिकारपदाचा तुसडेपणा नव्हता, कुठेही गोपनीयतेची पराकाष्ठा नव्हती. बैठकींव्यतिरिक्त त्यांचे साधे बोलणेही हितोपदेशच असे.

माझे अभाविप जीवनात फार काही अभ्यासवर्ग वा अधिवेशनं झाले नाहीत. पण रामदासजींच्या सोबत राहतांनाच सहज बोलण्यातून अनेक विषय समजत. मुंजे चौकातील लक्ष्मीविलास हॉटेल मध्ये चहा पितांना ते सहजच बोलून जात तीन दिवस बुलढाण्याला होतो. चिखलीला बाळासाहेबांकडे जाऊन आलो. बोलतांना अनेक विषय कळले. आपले विद्यार्थी परिषदेचे काम म्हणजे रामदासी घडवण्याचेच काम आहे. महंते महंत करावे युक्तीबुद्धीने भरावे, जाणते करून विखरावे नाना देशी. विदर्भातील प्रवासादरम्यानच्या अनेक गोष्टी ते सहज गप्पांमधून सांगत.

रामदासजी वागण्या बोलण्यात इतके साधे होते की ते आपले नाव फक्त 'रामदास भगवानजी आंबटकर' असेच सांगत. फार फार नंतर कळले की त्यांनी बीएएमएस केले आहे. वैद्य रामदास आंबटकर वा डॉक्टर रामदास आंबटकर असे नाव त्यांनी सांगितले असते तर ते प्रचलित पद्धतीनुसारच ठरले असते. पण संघटना ही सर्वोच्च आहे, चर्चा घडावी ती तत्त्वाचीच. असेच त्यांना वाटत असल्याने त्यांनी संघटनेपेक्षा स्वतःला मोठे वा अलौकिक होऊ दिले नाही. रामदासजी स्वतः बद्दल फारच कमी बोलत. त्यांना दोन लहान बहिणी आहेत. त्यातील एक कॉलेजमध्ये यू आर झाली होती. तो विद्यापीठ निवडणुकीचा काळ होता. ती सुरक्षित राहावी म्हणून मला तिला आणायला बसने पाठवले होते. मी वडनेर गावी गेलो तेंव्हा रात्रच झाली होती. त्याकाळी फोनच क्वचित घरी होते. त्यामुळे संपर्काची आजच्यासारखी स्थिती नव्हती. नागपूर नगर संघटनमंत्री प्रविणजी टेंभेकरांनी मला फक्त वडनेरला अमुकतमुक वार्डात जा, व रामदासजींच्या बहिणींना नागपूरला घेऊन ये, असा परस्पर निरोप दिला होता. हिवाळ्याचे दिवस होते ते. मी रात्री साडेसात च्या दरम्यान वडनेरला पोहचलो. तिथे पोहचल्यावरच आंबटकर परिवाराला गावात किती प्रतिष्ठा आहे ते कळले होते. माझ्याजवळ साधी चिठ्ठीही नव्हती. बिना परिचयाचे दोन मुली रात्री आपल्यासोबत येतील का? हा प्रश्न होता. मी रिक्षाने रामदासजींच्या घरी गेलो. ओळख सांगितली व आपल्याला नागपूरला जायचे आहे, असे त्या दोघी भगिनींना सांगितले.



रामदासजींचा, म्हणजे आपल्या भावाचा मित्र घरी आलाय म्हटल्यावर त्या दोघींनी स्वयंपाक केला व आम्ही जेवण करून रात्रीच बसने नागपूरला आलो. स्वतः साधे असलेल्या रामदासजींचा वडनेरचा संपूर्ण परिवारही साधा आहे हे तेंव्हा लक्षात आले.

रामदासजींचे वडील भगवानजी आंबटकर हे राजकारणात होते व वैदर्भीय राजकारणातले भाजपातले एक आदरयुक्त नाव होते. ते दरवर्षी आपल्याशी संबंधित लोकांना घरी जेवायला बोलवत. त्या एक दोन मेळाव्यांना प्रविण टेंभेकर, सुनील आंबेकर यांच्यासह मी पण गेलो होतो.

होळी धुळवडी दरम्यान रामदासजी नागपूरलाच राहात. त्याकाळी माझ्याकडे टीव्हीएस एक्सटी (प्रचलित नाव टीव्हीएस५०) ही मोपेड होती. तिच्यावर मी, प्रविणजी टेंभेकर व रामदासजी आंबटकर असे तिघं बसून अरुण श्रीवास्तवांचे पाचपावलीतील घर ते शिवाजी नगरचे दत्ताजी डिडोळकरांचे घर व तिथून सुधाकरराव भालेरावांचे बजाज नगरचे घर असे पूर्ण नागपूर आम्ही फिरत असू.

गोपनीयतेचा दिखावा रामदासजींच्या स्वभावातच नव्हता. त्यामुळे ते परिपूर्ण पारदर्शक वाटत. अंदाजे १९८९ च्या दरम्यान रामदासजी पूर्णकालिक म्हणून थांबले व तरुण भारत वृत्तपत्रात सहसंपादक म्हणून रूजू झाले. त्यांना भेटायला मी तरुण भारतात जात असे. चहा प्यायला गेल्यावर ते अभाविपतले आदर्श जीवन व प्रत्यक्ष व्यावहारिक जीवन यातील तफावत फार रंगतदारपणे सांगत.

पुढे मी पण पूर्णकालिक म्हणून पहिले आसाम व नंतर मध्यप्रदेशात गेलो. जाण्यापूर्वी रामदासजींकडून काही मार्गदर्शन घेतले. ते म्हणाले, मी भारतमातेला उच्चासनावर बसवायला काम करत आहे, हा भाव असावा, म्हणजे काम करतांना आलेले सन्मान व अपमान हे त्रास देत नाहीत. भारतमातेसोबत आपले अनुसंधान राहावे म्हणून काम करत असतांना आपल्याला येत असलेले परिषद गीतं गुणगुणत राहावे. तसा आपल्या कार्यप्रणालीत कार्यकर्ता आपोआपच घडत जातो. रामदासजींच्या या पाथेयाने माझा पूर्णकालिक कार्यकाळ चांगला राहीला. मी वापस आलो तोवर रामदासजींनी भाजपाचे पूर्णवेळ काम सुरू केले होते व त्यांना नागपूर बाहेरचे क्षेत्र होते. त्यामुळे कधीतरी पुर्वकार्यकर्त्यांच्या बैठकीत भेट होई. अध्येमध्ये कुठे कोणाकडे लग्नसमारंभातही भेट होई. तेंव्हा ते घरच्या सर्वच मंडळींची आठवण काढत. मधल्या काळात त्यांनी म्हाळगीनगरला अजिंक्य मेडिकल स्टोअरही काढले होते. माझे मोठेभाऊ त्या भागातच राहात असल्याने भावाकडे जातांना रामदासजींची कधी भेट होई.

काहीवर्षांपुर्वी ते विधानपरिषद आमदार झाले. आपल्या वडीलांचीच सर्वांना वर्षातून एकदा सर्व परिचितांना एकत्रित बोलवण्याची पद्धत त्यांनीही सुरू केली. अभाविपच्या विदर्भातील पुर्व कार्यकर्त्यांना एकत्रित आणायला तू माझा सांगाती या नावाने अलग अलग ठिकाणी अशी संमेलने झालीत. नागपूरच्या सम्मेलनाला मी पण गेलो होतो. अगदी याच वर्षी गेल्या २२ जानेवारीला सौ सीमा सालोडकरच्या मुलीच्या लग्नात त्यांची व वहिनींची भेट झाली होती. तेंव्हा मी त्यांना माझ्या अभाविपतील पूर्णकालिक कार्यकाळातील अनुभवांचे पुस्तक छापत आहे, हे सांगितले व काही गरज पडल्यास तुम्हाला भेटायला येईल हे ही सांगितले. तेंव्हा माझ्या मुलाकडे बघत ते गमतीने म्हणाले, आता तू पण अभाविपचे काम करतोय तर वडीलांसारखेच समोर राहून काम कर,

पण कामासाठी बाहेर जाऊ नको. हा पठ्ठा बाहेर जाऊन आला व नंतर कोणाच्याच हातात सापडला नाही . पुढे आठच दिवसांनी त्यांची रेशिमबागला झालेल्या विद्यार्थी परिषदेच्या विदर्भ प्रांत अधीवेशनात भेट झाली. रात्रीच्या जेवणादरम्यान आम्ही सोबतच होतो. तेंव्हा त्यांना माझे पुस्तक दाखवले. पण तोवर अधिवेशनात त्याचे प्रकाशन न झाल्याने त्यांना ते पुस्तक देता आले नाही. ते म्हणाले, किशोर, हे पुस्तक मी तुझ्याकडून विकतच घेईल. नंतर त्यांनी माझे विद्यार्थी परिषदेतून घडतांना हे पुस्तक व माझ्याकडे असलेली राष्ट्रीय दिनदर्शिका माझ्या अकाउंट मध्ये पैसे टाकून खरोखरच विकत घेतले. ते पुस्तक द्यायला त्यांच्याकडे जाणेमात्र जमलेच नाही, म्हणून त्यांना फोन करून ते कोरियरने पाठवले. अधिवेशनात सोबत जेवतांना ही त्यांची शेवटचीच भेट आहे, असे मात्र वाटले नव्हते.

आज अक्षय्य तृतियेच्या शुभमुहूर्तावर त्यांनी आपला देह भारतमातार्पण केला. पुज्य भारतमातेच्या अर्चनेत त्यांनी ऐन तारुण्यात मन समर्पित केलेले होतेच. आता देह नावाचे उपकरणही त्यांनी समर्पित केले व ते अनंताच्या प्रवासाला गेले. आरती भी हो रही है, गीत बनकर क्या करूँगा, पुष्प माला चढ़ रही है, फूल बनकर क्या करूँगा, मालिका का एक तन्तु, गीत का मैं एक स्वर हूँ, पूज्य माँ की अर्चना का एक छोटा उपकरण हूँ..।। विद्यार्थी परिषदेतून घडलेला कार्यकर्ता पुढे भारतीय जनता पार्टीला तळागाळात पोहचवत आपल्या शरीराचा कणन् कण भारतमातेसाठी झिजवत भारतमातेच्या चरणी लीन झाला! स्वर्गीय रामदासजींना भगवंत सद्गती प्रदान करो, ही प्रार्थना!

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।**
**ॐ शांती शांती शांती!**

## वेध

नीलेश जोशी

# 'त्यांचे' जीवन दुसऱ्याच्या रक्तावर

नवदाम्पत्याच्या जीवनातील सर्वांत सुखद क्षण असतो तो चिमुकल्याच्या आगमनाची वार्ता. नवीन पाहुणा घरात येणार याची चाहूल लागताच कुटुंबीयांच्या मनातील आनंदाची तर मोजदाद करता येत नाही. त्याच्या येण्यापूर्वीच विविध स्वप्ने रंगविली जातात आणि त्याच्या येण्याची आतुरता क्षणाक्षणाने वाढत असते. ज्या क्षणी त्याचे, तिचे आगमन होते तो क्षण तर आई-वडील झालेल्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण. मग पुढील काही महिने शिशूच्या बाललीलांमध्ये कसे संपतात ते देखील कळत नाही. पण हा आनंद अनुभवत असतानाच दुर्दैवाने काहींच्या वाटेला दुःख येते. सतत आजारी पडणाऱ्या चिमुकल्याला झाले तरी काय असा प्रश्न उपस्थित राहतो आणि ज्या वेळी वैद्यकीय निदान होते त्यावेळी मात्र त्यांची स्थिती आभाळ कोसळल्यागत होते. कारण वैद्यकीय अहवालात त्याला 'थॅलेसेमिया' आजाराचे निदान झाले असते. 'थॅलेसेमिया' हा रक्ताचा आनुवंशिक आजार आहे. हा आजार असणाऱ्या रुग्णाला जीवनभर दुसऱ्याच्या रक्ताच्या भरवशावर जगावे लागते. रक्तातील विकृतीमुळे 'थॅलेसेमिया' रुग्णाच्या शरीरात हिमोग्लोबिनची निर्मिती होत नाही. खरं म्हणजे ही एक मोठी राष्ट्रीय समस्या आहे. अन् त्यातही या विकाराबाबतची अनभिज्ञता आणि त्याचे उच्चाटन करण्याची उदासीनता त्यामुळे दिवसेंदिवस या विकारग्रस्तांची संख्या वाढत आहे. ही चिंतेची बाब आहे.

थॅलेसेमिया हा एक प्रकारचा आनुवंशिक पंडुरोग आहे. थॅलेसेमिया मायनर आणि थॅलेसेमिया मेजर असे दोन प्रकार या आजाराची असतात. त्यात मायनर असणारी व्यक्ती सामान्य जीवन जगते. तिला नियमित जीवन जगत असताना कुठलीही अडचण येत नाही. अगदी अमिताभ बच्चन, जॅकी श्रॉफ, हार्दिक पंड्या ही आपल्या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती थॅलेसेमिया मायनर असल्याचे सांगितल्यास कुणाला विश्वासही बसणार नाही. पण या आजारातील दुसरा प्रकार म्हणजे थॅलेसेमिया मेजर. या रुग्णाला मात्र असह्य शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागते आणि आधी उल्लेखिल्याप्रमाणे हा रुग्ण जीवनभर दुसऱ्याच्या रक्ताच्या भरवशावर जगतो. एवढेच नव्हे तर उपचार न केल्यास थॅलेसेमिया मेजर व्यक्ती अल्पायुषी ठरते. असे असताना देखील धक्कादायक म्हणजे भारतात दरवर्षी एक लाख थॅलेसेमियाग्रस्त बालके जन्माला येतात. एक नवीन थॅलेसेमियाग्रस्त जन्माला येणे म्हणजे कुटुंबावर, समाजावर, राष्ट्रावर आणि मुख्यतः राष्ट्रीय रक्तसेवेवर मोठा बोझा आहे आणि म्हणूनच थॅलेसेमिया समूळ नष्ट होण्याकरिता समाजातील प्रत्येक घटकाने विशेषतः तरुणांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. कुणालाही थॅलेसेमिया मेजर विकार होऊच नये यासाठी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाने लग्नापूर्वी स्वतःची थॅलेसेमिया तपासणी करणे, ही साधी रक्ताची तपासणी आहे. यात जर थॅलेसेमिया मायनर हा आजार आढळला तर त्या व्यक्तीने लग्न करताना थॅलेसेमिया मायनर असलेल्या व्यक्तीशी लग्न करू नये. काही अपरिहार्य बाबींमुळे जर लग्न करायचे ठरलेच तर गर्भधारणा झाल्यावर वैद्यकीय सल्ल्यानुसार उपाययोजना कराव्यात. ज्यात अपत्य थॅलेसेमिया मेजर आजाराचे असणार नाही याची खात्री केली जाते. कारण थॅलेसेमिया मायनर दाम्पत्याला होणारे अपत्य थॅलेसेमिया मेजर विकार घेऊन जन्माला येण्याची दाट शक्यता असते.

वास्तविक थॅलेसेमिया मेजर रुग्णाच्या, त्यांच्या कुटुंबीयांच्या व्यथा अत्यंत वेदनादायी आहेत. नकळत्या वयातील मुला-मुलीला दर महिन्यात द्यावे लागणारे रक्त हा सर्वांत मोठा प्रश्न असतो. या शारीरिक समस्येसोबतच दुर्दैवाने समाज देखील वेगळ्या नजरेने पाहतो. अनेक वेळा त्यांना सहानभूती मिळते. पण नकळत्या वयात वेगळेपणाची जाणीवही होते. आई-वडील प्रत्येक क्षण या मुलांच्या आरोग्याच्या काळजीत असतात. म्हणूनच थॅलेसेमिया केवळ आजार नव्हे तर भावनिक आणि सामाजिक लढा देखील आहे. हा आजार होऊ नये यासाठी जशी रक्ताची तपासणी आवश्यक आहे तशीच याबाबत जनजागृती देखील महत्त्वाची आहे. ही जनजागृती व्यापक स्वरूपात होऊन प्रत्येक अविवाहित युवक, युवतींनी थॅलेसेमिया तपासणी करणे गरजेचे आहे. यासोबतच समाजात थॅलेसेमिया विकार असलेले रुग्ण देखील समाजाची जबाबदारी आहे यात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे या रुग्णांना नियमित लागणारे रक्त ही गरज पूर्ण करण्यासाठी विविध संस्था, संघटनांनी त्या रुग्णांचे रक्तपालकत्व स्वीकारणे आवश्यक आहे. ८ मे हा जागतिक थॅलेसेमिया दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्त थॅलेसेमिया विकाराचे उच्चाटन करण्याचा संकल्प करू या.

९४२२८६२४८४

### पाकिस्तानला आधी स्वतःच्या मरणाने मरू द्यावे

पहलगाम प्रकरणानंतर पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याबाबत देशप्रेमी जनतेकडून केंद्र सरकारवर दबाव वाढत आहे आणि ते स्वाभाविकही आहे. मात्र भारताने पाकिस्तानला आधी स्वतःच्या मरणाने मरू द्यावे. तिथे आता स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीने नव्याने जोर धरला आहे. स्वतंत्र पख्तुनिस्तानची मागणीदेखील ७५ पेक्षा जास्त वर्षांइतकी जुनी आहे. जिये सिंध ही चळवळदेखील तितकीच जुनी असून सध्या सिंधमधील जनता पाकिस्तानातील (पश्चिम) पंजाब्यांच्या विरोधात रस्त्यांवर उतरली आहे. व्याप्त काश्मीरमध्येदेखील जुलमी राजवटीच्या विरोधात बंडाळी होतच असते. तेव्हा पाकिस्तानची शकले होऊन ते स्वतःच्या मरणाने मरणारच आहे. त्यानंतर भारताने शेवटचा घाव घालावा. मेलेल्याला आणखी मारू नये म्हणतात, पण पाकिस्तानच्या बाबतीत स्वतंत्र न्याय लावावा. मात्र भारताने कायम सज्ज राहावे. पाकिस्तानातील असंतुष्ट जनतेचे लक्ष इतरत्र वळविण्यासाठी पाकिस्तानी राज्यकर्ते जेव्हा भारताशी पंगा घेण्याचे दुःसाहस करतील, तेव्हाच त्यांचे कंबरडे मोडणे आवश्यक आहे. त्याआधी सिंधू पाणीकरारास स्थगिती, पाकिस्तानी नागरिकांना त्वरित भारत सोडून देण्याचा आदेश, इत्यादीबाबतची कारवाई होतच आहे. पाकिस्तानची आर्थिक आणि व्यापारविषयक, औषधविषयक कोंडी करण्यात येत आहेच. भारतात आता जी जनजागृती वाढली आहे, त्या वातावरणात देशातील पाकिस्तानबद्दल पुळका असलेले फेक्युलर फुरोगामी, हिंदू नावे धारण करणारे छुपे देशद्रोही, पाकिस्तानची भाषा बोलणारे विरोधी नेते, देशभरात पसरलेले अस्तनीतले निखारे या सर्वांची गठडी वळणे आवश्यक आहे. बाह्यशत्रूंचा बंदोबस्त होईलच, पण देशांतर्गत देशद्रोही शक्तींचा बीमोड या निमित्ताने करणे आवश्यक आहे.

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

## वाचक पत्रे

### प्लॅस्टिकचा वापर घातकच

प्लॅस्टिकच्या पिशव्या व इतर गोष्टींची रोजच्या जीवनात खूप सवय झाली आहे. प्लॅस्टिक वजनाला हलके व वापरायला सोपे. परंतु प्लॅस्टिकचे परिणाम बघून समाज घाबरला. अनेक जनावरांच्या पोटातून प्लॅस्टिक पिशव्या काढल्यात. गरम पदार्थांसाठी वापरल्यास कर्करोग होतो. भाजी आणायला कापडाची पिशवी वापरू परंतु इतर गोष्टींचे काय? पूर्वी सकाळी उठून दुधासाठी भांडे किंवा बरणी घेऊन जात. तेलासाठी डबकी असायची. खेड्यांतील लोक काचेच्या बाटलीत रिंगाभर अर्धा लिटर तेल आणायचे. बाटलीला दोरी बांधून ती हातात किंवा सायकलला अडकवीत. दुकानातून किराणामाल कागदात बांधून देत. खूपदा पुडी फुटत किंवा कागद फाटला तर सर्व किराणा माल एकत्र होत असे. भटक्या समाजातील लोक कपड्यात हळद, तिखट, बेसन बांधून ठेवत. त्यांच्या संसाराला पुरचंडीचा संसार म्हणत. लग्नकार्यात कापडाच्या पिशवीत सुपारी, तिखट, दाणे वगैरे ठेवून त्यावर नावे लिहीत.

या पिशव्यांनी अनेक लग्नकार्ये पाहिली. लोणचे, तूप बरणीत. तांदूळ, डाळ वगैरे पोत्यांत. आमच्या वेळी गावाला जाताना फिरकीचा तांबा किंवा मातीची सुरई. आता बिसलरी वॉटर बाटलीत मिळते. आपण ते वापरतो व फेकून देतो. कचरेवाले ते उचलून विकतात. खूपदा त्यात साधे पाणी असते. खूपदा या पाण्यात केस, माशी, नारू निघाला आहे. पुरचंडीचा संसार प्लॅस्टिकमध्ये आला. परंतु या पिशव्यांचे जमिनीत मिसळून खत होत नाही. अचानक प्लॅस्टिकचे पेले, प्लेट, पिशव्यांचे वाईट परिणाम माहीत झाले. प्लॅस्टिकवर बंदी आली, दंड आकारण्यात आला. मेडिकल दुकानात कापडाच्या किंवा कागदाच्या पिशव्या वापरू लागले. प्लॉस्टक मेडिकलसाठी वरदान ठरले आहे.

प्लॅस्टिकच्या इंजेक्शन सिरींजमुळे वापरा व फेका. त्यामुळे गरम पाण्यात उकळणे इन्फेक्शन वगैरेची भीती राहिली नाही. प्लॅस्टिकचा चहाचा कप प्रकृतीला घातक असल्यामुळे खूप जण स्वत:जवळ कप ठेवून त्यात चहा, कॉफी पितात. प्रत्येक गोष्टींत चांगले-वाईट असते. म्हणूनच प्लॅस्टिक वापरताना योग्य विचार करावा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### हिंदी संपर्क भाषा म्हणून योग्य



मुलांना चौथीपर्यंत शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे. विषय पण तोच. घरी जी भाषा वापरली जाते, तिचं आकलन लवकर होते. पाचवीपासून इंग्रजी व हिंदी अनिवार्य असावे. उत्तर भारतातील राज्यात हिंदी भाषा वापरली जाते. एक संपर्क भाषा म्हणून ती आवश्यक आहे. ती शिकायला सोपी आहे. सर्वच प्रांतात असे केल्यास नोकरीनिमित्त परप्रांतात गेल्यावर प्रश्न निर्माण होणार नाही. असं मला वाटतं. राज ठाकरे यांना यात काय समस्या आहे. त्यांना तर शिकायचं नाही. प्रत्येक गोष्टीत राजकारण करू नये. बघा पटतंय का?

**विभावरी नाईक**/९४२०८५५४७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्ह्याच्या चौफेर प्रगतीसाठी सर्वांनी प्रयत्न करू या- पालकमंत्री

## महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिल्या जनतेला शुभेच्छा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

विकासाकडे झेपावणारा आपला हिंगोली जिल्हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करीत आहे. जिल्ह्याची चौफेर प्रगती व्हावी यासाठी जागरुक नागरिक म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करु या, असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले.

येथील संत नामदेव कवायत मैदानावर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार डॉ.प्रज्ञाताई सातव, आमदार तानाजी मुटकुळे, माजी आमदार रामराव वडकुते, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, गणेश वाघ, केशव गड्डापोड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. झिरवाळ म्हणाले, महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी योगदान व बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात, महान विभूतींना मी सर्वप्रथम अभिवादन करतो. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेंव्हा पासूनच राज्याने सर्वच क्षेत्रामध्ये विकासाची मोठी भरारी घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक, साहित्य-संस्कृती या क्षेत्रातही अभूतपूर्व प्रगती करीत देशाच्या विकासामध्ये नेहमीच सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यामुळेच आज आपले राज्य देशातील अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. आज आपण आंतरराष्ट्रीय कामगार दिन ही साजरा करीत असून, देशाला प्रगतीपथावर आणण्यामध्ये कामगार बांधवांचा महत्वाचा वाटा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ७ कलमी कार्यक्रमाच्या 'मिशन १०० दिवसा'च्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासकीय सुधारणा आणि गुंतवणूक प्रोत्साहन यावर भर दिला जात असल्याचे सांगून शासनाने ग्रीस्टॅक योजना सुरु केली असल्याचे सांगितले. ग्रीस्टॅकद्वारे शेतकऱ्यांचा डाटा एकत्रित केला जाणार जात आहे. या डेटाच्या आधारे विविध शेतीविषयक माहिती मिळाल्याने शासनाला त्वरित निर्णय घेणे सुलभ होणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख ८६ हजार ३२९ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळख क्रमांक तयार केले असून उर्वरित शेतकऱ्यांचे आयडी तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे पालकमंत्री श्री.झिरवाळ यांनी सांगितले.

राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द पध्दतीने लोकसेवा देता याव्या यासाठी शासनाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' लागू केला आहे. यामुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित झाली आहे. हा अधिनियम २८ एप्रिल २०१५ रोजी अंमलात आला असून जिल्ह्यात सर्वत्र विविध उपक्रम राबवून हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने जिल्ह्यातील सर्वधर्मीय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिकांना 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतंगत दि. १९ एप्रिल रोजी रेल्वेने अयोध्या दर्शनाचा लाभ दिल्यामुळे त्यांची तीर्थदर्शनाची इच्छा पूर्ण झाली आहे, अशी माहितीही पालकमंत्री श्री. झिरवाळ यांनी दिली. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा दोन साठी हिंगोली जिल्ह्यातील १४८ गावांना शासनाने मंजुरी दिली आहे. सद्यस्थितीमध्ये गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा लोकसहभागीय पध्दतीने तयार करण्याची सूक्ष्म नियोजन प्रक्रिया १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत ठिबक सिंचन व तुषार सिंचन संचासाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे ४२१७ लाभार्थ्यांना ७७१ लाख ७१ हजार रुपयाचे अनुदान अदा करण्यात आले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी ७७२ प्रकल्पांचे कर्ज मंजुरीचे प्रस्ताव विविध बँकाकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच १९८ उद्योगांना १२ कोटी ४५ लाख रुपये बँकाद्वारे कर्ज मंजूर करण्यात आले असल्याचे सांगून हिंगोली जिल्ह्यात वसमत येथे मा.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (हळद) हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्रामार्फत हळदीच्या आधुनिक वाणाचे संशोधन व विस्ताराचे काम चालू आहे. याचा हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे. जिल्ह्यात हळद उत्पादक शेतकरी, कंपन्या आणि हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून तज्ञांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळे वसमत हळद या नावाने हिंगोलीच्या हळदीला भौगोलिक मानांकनांचा दर्जा प्राप्त झाला असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री श्री. झिरवाळ यांनी यावेळी केले.

जिल्ह्यात ८ ते २२ एप्रिल, २०२५ या कालावधीत राष्ट्रीय पोषण पंधरवाडा राबविण्यात आला. या पंधरवाड्यांतर्गत माहे एप्रिल, २०२५ अतंर्गत जन आंदोलन डॅश बोर्डवर ग्रामीण व शहरी भागातील ११९७ अंगणवाडी केंद्र स्तरावर महिला व बाल कल्याण विभागाने आजपर्यंत ७९ हजार १५० (प्रती अंगणवाडी केंद्र ६६.१२) उपक्रमांच्या ऑनलाईन नोंदी करुन राज्यात द्वितीय क्रमांक आला आहे. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागामार्फत प्रधानमंत्री विश्वकर्मा सन्मान योजना, प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास योजना, किमान कौशल्य विकास कार्यक्रम, आचार्य चाणक्य कौशल्य विकास कार्यक्रम अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील ५ हजार ६१३ उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत २६६२ कार्य प्रशिक्षणार्थी घेत आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून वैयक्तीक व्याज कर्ज परतावा योजनेचा ९२० तर गट व्याज कर्ज परतावा योजनेचा २१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. हिंगोली जिल्ह्यातील १५ पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यामध्ये २९८ उमेदवारांना खाजगी आस्थापनेमध्ये रोजगार प्राप्त झाला आहे, अशी माहिती पालकमंत्री श्री. झिरवाळ यांनी यावेळी दिली. यावेळी शैक्षणिक कामासाठी सिंगापूर अभ्यास दौरा केलेले शिक्षक प्रदीप घोंगडे, एनआरसी डिजिटल आयुष्यमान भारत मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, वैद्यकीय अधिकारी गोपाळ कदम, अस्थिरोग तज्ञ डॉ.मनीष बगडिया, वैद्यकीय अधिकारी डॉ.बालाजी भाकरे, वैद्यकीय अधिकारी दंतरोग तज्ञ डॉ.फैसल खान यांचा पालकमंत्री श्री. झिरवाळ यांच्या हस्ते प्रशस्तपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कामगिरी केलेले पोलीस उपनिरीक्षक साहेबराव कसबेवाड, पोलीस गौसखान पठाण, माझी वसुंधरा अभियानात द्वितीय क्रमांक मिळाल्यामुळे मुख्याधिकारी अरविंद मुढे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अण्णाराव कांबळे, उप अभियंता कृषक तांबडे यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

तसेच यावेळी कंपोस्ट खड्डा भरु आपले गाव स्वच्छ ठेवू या मोहिमेचा शुभारंभ पालकमंत्री श्री. झिरवाळ यांच्या हस्ते फलकाचे अनावरण करुन करण्यात आले. हिंगोली जिल्हा पोलीस दलाच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी हिंगोली पोलीस विभागासाठी प्राप्त १३ वाहनाचे लोकार्पण पालकमंत्री श्री. झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंडीत अवचार यांनी केले. यावेळी पोलीस, राज्य राखीव दल, होमगार्ड पथक तसेच बँक पथकाने परेडचे शानदार संचालन केले. याप्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मुणगल, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी डॉ.राजेंद्र कदम यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलजीवन मिशनचे मापदंड बदलण्याची गरज- झिरवाळ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

राज्यातील जलजीवन मिशन योजनेद्वारे अनेक ठिकाणी पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी असून सदर योजनाच कुचकामी ठरली आहे. या योजनेच्या मापदंडात बदल करण्याची गरज असल्याचे मत अन्न व औषध प्रशासन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी व्यक्त केले.

पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे संत कवायत मैदानावरील ध्वजारोहनानंतर पत्रकारांशी संवाद साधत असतांना पत्रकारांनी जल जीवन मिशन अंतर्गत अनेक गावात नळ योजना झाली मात्र गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. यावर झिरवाळ यांनी सदर योजनाच कुचकामी ठरल्याचे सांगत सदर योजनेचा आराखडा केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. केंद्र व राज्यामार्फत ही योजना चालविली जात आहे. मात्र आता या योजनेच्या मापदंडात बदल केले पाहीजे. सदर योजना राबविताना आधी उद्‌भव घेऊन त्याला पाणी लागल्यानंतरच इतर कामे करणे अपेक्षित आहे. त्यासाठी पैसे जास्त खर्च करावे लागतील. उद्‌भव लांब असून चार योजना तयार करूनही पाणी मिळत नसेल तर त्याचा काय उपयोग. त्यासाठी कंत्राटदारावर किंवा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यापेक्षा योजना राबविण्याच्या मापदंडातच चुका आहेत हे योजनेचे अपयश असल्याची प्रतिक्रीया त्यांनी दिली.

या योजनेच्या सुधारणेसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाला कळविल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. राज्यातील रिक्त पदांच्या प्रश्नावर त्यांनी सदर पदे तातडीने भरण्याबाबत सुचना दिल्या जातील असे सांगितले. तर हिंगोली जिल्ह्यात टँकरची मागणी आल्यानंतर तातडीने टँकर सुरू करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचे सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आ प्रज्ञा सातव, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- माझी वसुंधरा, स्वच्छ शहर सुंदर शहर मध्ये हिंगोली नगर परिषदेने उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पालकमंत्री नरहरि झिरवाळ यांचेहस्ते महाराष्ट्र दिनी प्रमाणपत्र स्विकारतांना मुख्याधिकारी अरविंद मुंढे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहन



हिंगोली- जिल्हाधिकारी कार्यालयात आज महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा नियोजन अधिकारी ग.गो.चितळे, महसूल विभागाचे तहसीलदार आश्विनकुमार माने, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त डॉ.राजपाल कोल्हे यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### सांडपाणी प्रक्रिया केंद्रास जिल्हाधिकाऱ्यांची भेट



हिंगोली- शहरातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र व सांडपाणी विहीरीस जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दि १ मे रोजी भेट दिली. यावेळी लवकरात लवकर ट्रान्सफार्मर सुरू करून सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले आहेत. यावेळी या केंद्राबाबत मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी सविस्तर माहीती दिली. यावेळी नगर अभियंता प्रतीन नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, राजेश पद्मणे, राज शिंदे आदींची उपस्थिती होती.

### पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांच्या रांगा



हिंगोली- शहरात मागील आठ दिवसात पाणी टंचाईमुळे नागरिकांनी खाजगी पाणी विक्रेत्यांच्या दुकानांसमोर पिण्याचे पाणी विकत घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या.

# अडीच कोटी रूपये खर्च करून केलेली पाईप लाईन फुटली

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २ मे**

काही दिवसांपूर्वी वसमतला उदघाटन झालेली पाईप लाईन आज फुटली नवीन पाईप असून सुद्धा दोनच दिवसांमध्ये पाईप लाईन फुटल्याने संबंधित गुत्तेदाराच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वसमत शहरातील बंद पडलेली सतीपांगरा पाणीपुरवठा योजना पुन्हा एकदा सुरू करण्यात आली आहे आमदार राजू नवघरे यांनी या योजनेसाठी अडीचकोटी रुपयांचा निधी दिला त्यातून बंद पडलेली योजना पुन्हा योजना सुरू झाली. शुक्रवारी या योजनेचा लोकार्पण सोहळा पार पडला यातून आता वसमत चा पाणी प्रश्न कायमचा निकाली निघाला आहे त्यामुळे वसमतमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



वसमतनगर नगरपरिषद अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजना (४२१७ ६०३) सन २०२३- २०२४ अंतर्गत वसमत नगरपरिषद सती पांगरा तलाव पाणी पुरवठा योजना मशीनरी कामे करणे अश्या स्वरूपाचे तब्बल अडीच कोटी रुपयांचे हे कामं होते गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांचे उडवाऊडवीची उत्तरे ऐकून ही पाईप लाईन नवीन आहे कि जुनी, या पाठीमागे गौडबंगाल दिसत आहे.

वसमत ध्ये वाढीव पाणीपुरवठा योजना सुरू होण्यापूर्वी सतीपांगरा पाणीपुरवठा योजनेवर वसमत शहराचा पाणीपुरवठा अवलंबून होता. या पाणीपुरवठा योजनेत सतीपांगरा येथे तलावातून शहराला दोन वेळेस भरपूर पाणीपुरवठा होत असे नवीन पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यानंतर जुनी पाणीपुरवठा योजना अडगळीत बंद पडली.

वाढीव पाणीपुरवठा योजना ६२ कोटी रुपयांची झाली सिद्धेश्वर पासून वसमत पर्यंत पाईपलाईनने पाणीपुरवठा सुरू झाला योजना सुरू झाल्यानंतरही वसमत शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता सिद्धेश्वर वरील वीज पुरवठा खंडित होणे पाईपलाईन वारंवार फुटणे यातून दुरुस्ती व तांत्रिक कामामुळे पंधरा-पंधरा दिवस शहराला निर्जळी घडत होती त्यातून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त व्हायच्या पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी मुख्याधिकारी यांना फक्त पाईपलाईन दुरुस्ती करणे एवढेच काम राहिले होते एका ठिकाणी पाईपलाईन दुरुस्ती केली. वसमतची पाणीटंचाई दूर होत नाही त्यामुळे यावर रामबाण इलाज म्हणून आमदार राजू नवघरे यांनी बंद पडलेली सती पांगरा पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरू करण्याचा निर्धार केला त्यासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला त्यातून सती पांगरा तलावाचे दुरुस्ती मशनरी व पाईपलाईन इतर कामे झाली व अक्षरशः बंद पडलेली योजना पुन्हा सुरू झाली आहे या योजनेचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी पार पडला.

अनेक वर्षांपासून बंद असलेली पाईप लाईन आमदार राजू नवघरे यांच्या अथक प्रयत्नने पुन्हा एकदा सुरु झाली आहे त्यामुळे वसमतकरांना पाण्याची चिंता संपली होती.

पण नवीन पाईप लाईन टाकणाऱ्या गुत्तेदारमुळे या कामाबद्दल वसमतकरांच्या काळजाचा ठोका चुकवला असून दोनच दिवसात लाईन फुटल्याने पाणी पुरवठा कसा सुरळीत होणार हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. नवीन पाईप लाईन फुटल्यामुळे तालुका कृषी समोरील परिसरात तालावा सारखी परिस्थिती निर्माण झाली असून हजारो लिटर पाणी वाया जातं आहे. या प्रकरणी आमच्या प्रतिनिधिने वसमत नगर परिषदचे मुख्याधिकारी यांच्याशी बोलले असता त्यांनी सध्या नवीन पाईप लाईन ची टेस्टिंग सुरु असल्याचे सांगितले आहे मग काय टेस्टिंग करण्याआधीच उदघाटनची इतकी घाई कशासाठी केली अशी चर्चा होत आहे.

# पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवला पाहीजे- जिल्हाधिकारी गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

प्रत्येकाने आपल्या घरामध्ये पाण्याच्या स्त्रोताचा नियमित वापर करताना विविध उपक्रम राबवून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत जलसंपदा विभागाच्या वतीने जिल्हा नियोजन समिती सभागृहामध्ये जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या समारोप कार्यक्रमाचे उद्धाटन व जलपूजन आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते जिल्ह्यातील पूर्णा, कयाधू व पैनगंगा या तीनही मुख्य नद्यांतील पाण्याचे जलपूजन करुन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अधीक्षक अभियंता तथा पालक अभियंता सुधाकर कचकलवार, कार्यकारी अभियंता आण्णाराव कांबळे, कार्यकारी अभियंता संतोष बिराजदार, कार्यकारी अभियंता श्री. शेख, कृषी उपसंचालक प्रसाद हजारे, 'उगम'चे जयाजी पाईकराव यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी श्री. गुप्ता पुढे म्हणाले, जिल्ह्यात दोन ते तीन टक्केच वनक्षेत्र आहे. ते वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घरी पाच झाडे लावावीत. पाण्याच्या स्त्रोत वाढविण्यासाठी घरामध्ये शोषखड्डा, पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टींग यासारखे उपक्रम राबवावेत. तसेच जिल्ह्यातील सर्व नद्यांचे पुनरुर्जीवन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थाची बैठक घेऊन त्यांच्या माध्यमातून पुनरुर्जीवन करण्याचे काम करण्यात येईल, असे सांगून पाण्याचे स्त्रोत वाढविण्यासाठी सर्व महत्वाच्या मुद्यांवर केवळ पंधरवाड्यातच जनजागृती मोहिम न राबविता सर्वांनी पाण्याचे महत्व ओळखून सतत पाण्याविषयी सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण करावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यासाठी प्रत्येक पाण्याचा थेंब जमिनीमध्ये जिरवण्यासाठी ठोस कार्यक्रम घेण्याची गरज आहे. यासाठी जलतारा, शोषखड्डे, वृक्ष लागवड, पाणी अडवा पाणी जिरवा यासारखे विविध उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे उगमचे जयाजी पाईकराव यांनी सांगितले.

प्रास्ताविकात पालक अभियंता सुधाकर कचकलवार यांनी जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा अभियानाच्या माध्यमातून गावागावात जाऊन पाणी वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. प्रत्येकाने आपल्या स्वत:पासून पाणी बचतीची सुरुवात करावी आणि कार्यक्रम पंधरवाड्यापुरता न राहता सतत राबविण्यात येईल, असे सांगितले.

कार्यकारी अभियंता आण्णाराव कांबळे यांनी जलव्यवस्थापन कृती पंधरवाड्यानिमित्त दि. १५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती सादरीद्वारे दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जल, कलश व वसुंधरेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर पाण्याचे महत्व सागंणारे गीत गाण्यात आले. तसेच डिग्रस कऱ्हाळे येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी माही गिराम यांनी पाण्याचे महत्त्व सांगितले. तसेच तेथील दुसरीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पाण्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी पाणी वापराबाबत जनजागृती करण्यात आलेल्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांचा तसेच उप अभियंता कृषक कांबळे यांचा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी उपस्थितांना जल प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. कोकरे यांनी केले, तर आभार उप अभियंता कृषक कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, जलसंपदा विभाग, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### एमएचटी-सीईटी २०२५ पीसीएम ग्रुपची ५ मे रोजी फेर परिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**जालना:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता राज्य सामाईक प्रवेश कक्षामार्फत घेण्यात आलेली एमएचटी-सीईटी २०२५ सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक ९ ते २७ एप्रिल, २०२५ या कालावधीत पार पाडली आहे. सदर परिक्षेदरम्यान दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात झालेल्या परिक्षेमध्ये उमेदवारांना गणित विषयाशी संबधीत तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे उमेदवारांनी सीईटी सेलकडे ई-मेल, पत्र, टिकीट सिस्टम, दुरध्वनी आणि प्रत्यक्ष सीईटीकक्षास भेट देवुन पालक/उमेदवारांनी आक्षेप/तक्रारी नोंदविल्या आहेत. उमेदवार/पालक यांच्या तक्रारीची दखल घेवून तसेच उमेदवारांच्या शैक्षणिक हित लक्षात घेता सीईटीसेल कडून पुढील निर्णय घेण्यात आला आहे.

दि. २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. त्याप्रमाणे दि. २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात परीक्षा दिलेली आहे, अशा परिक्षेकरिता उपस्थित सर्व उमेदवारांची फेरपरिक्षा दि. ५ मे, २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. याची संबंधीत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी. सदर परिक्षेस उपस्थित राहीलेल्या उमेदवारांची यादी सीईटीसेलच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. या यादीमध्ये नाव असलेल्या उमेदवारांनी फेरपरिक्षा देणे अनिवार्य आहे. सदर फेर परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांना त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी अधिकृत माहितीसाठी राज्य सीईटीकक्षाच्या संकेतस्थळ www.mahacet.og वर नियमीतपणे भेट द्यावी. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### डाक विभागाच्या'' ज्ञान पोस्ट'' सेवेला १ मे पासुन सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जालना :** भारतीय डाक विभागातर्फे नवीन ''ज्ञान पोस्ट'' ह्या सेवेची सुरुवात दिनांक १ मे पासून करण्यात आलेली आहे. ह्या सेवे अंतर्गत ज्ञान प्रसाराचे लेखी दस्तावेज, पुस्तके, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक साहित्य (लेखन) माफक दारात डाक सेवेच्या माध्यमातून पाठवणे शक्य होणार आहे. ''ज्ञान पोस्ट'' या नवीन मेल उत्पादनाची ओळख आढावा आणि उद्देश - ज्ञान पोस्ट हे टपाल विभागाच्या मेल सेवांतर्गत एक नवीन उत्पादन असेल, ज्याद्वारे प्रेषक विशिष्ट पुस्तके आणि अध्ययन साहित्य टपाल कार्यालयाद्वारे पाठवू शकेल. वैशिष्ट्ये -''ज्ञान पोस्ट'' या नवीन उत्पादनाची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेतः ऑनलाईन ट्रैकिंग सेवेद्वारे वस्तूचे ट्रॅक व ट्रेस करणे. पत्त्यानुसार विशिष्ट सेवा. पोस्टिंगचा पुरावा (पोस्टिंग पावती) प्रेषकास दिला जाईल. वितरणावेळी स्वाक्षरीनिशी मिळण्याचा पुरावा (विनंतीनुसार). या वर्गाअंतर्गत नोंदवलेले पार्सल्स भूपृष्ठ मार्गे (ींअॅषरलश ोवश) पाठवले जातील.''ज्ञान पोस्ट'' अंतर्गत पार्सल बुकिंगसाठी किमान वजन ३०० ग्रॅम आणि कमाल वजन ५ किलो असेल. हे उत्पादन टपाल कार्यालयाच्या काउंटरवर किरकोळ बुकिंगसाठी उपलब्ध असेल. प्रेषकासाठी इतर महत्त्वाच्या सुविधा - पोस्ट केलेल्या टपाल वस्तूचा प्रेषक जेथे ''प्रेषक'' असा उल्लेख आहे तेथे प्रेषक म्हणून विचार करण्यात यावा. पुढील अटींच्या अधीन राहून ती वस्तू पोस्टमधून मागे घेऊ शकतो किंवा तिचा पत्ता बदलू शकतो. जर ती वस्तू अद्याप प्राप्तकर्त्याच्या वितरणासाठी इनव्हॉईस केलेली नसेल. जर ती वस्तू देशातील कोणत्याही कायद्याअंतर्गत जप्त करण्यात आलेली नसेल. प्रेषक अतिरिक्त शुल्क भरून वस्तू परत मागवू शकतो, जर ती वस्तू अद्याप वितरण कार्यालयात वितरणासाठी इनव्हॉईस केलेली नसेल. तरी सर्वांनी ''ज्ञान पोस्ट'' ह्या सुविधेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन मोहम्मद खदीर, अधिक्षक, परभणी विभाग यांनी केले आहे.

### बेकायदेशीर बालगृहे, अनाथाश्रम, वसतिगृहे आढळुन आल्यास शासनास कळविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना :** पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येऊन त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच रुपये १ लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद नमुद करण्यात आलेली आहे. आपल्या आसपासच्या परिसरामध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ यावर संपर्क साधून बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे असे जाहिर आवाहन नयना गुंडे आयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांनी केले आहे.

# लाडक्या बहिणींच्या अनुदानातील कपात थांबवा नसता तीव्र आंदोलन छेडणार - कैलास गोरंटयाल

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनीधी**



ज्या लाडक्या बहिणींच्या बळावर सत्तेत आले.त्याच बहिणींच्या अनुदानात कपात करण्याचे पाप राज्यातील सत्ताधारी करत आहेत.जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार २१०० अनुदान तात्काळ द्यावे नसता लाडक्या बहिणींना सोबत घेऊन राज्य सरकार विरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे. राज्यात काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा व शिंदे सेनेने सत्तेत आल्यानंतर राज्यातील महिलांना लाडक्या बहीण योजनेअंतर्गत प्रतीमहा २१०० रुपये अनुदान देण्याचे आश्वासन निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. या योजनेचा लाभ देण्यासाठी राज्यातील महीला भगिनिंकडून स्थानिक प्रशासनामार्फत अर्ज मागवून प्राप्त अर्जांची कोणतीही छाननी न करता तसेच योजनेचे कोणतेही निकष निश्चित न करता अर्ज करणाऱ्या सर्वच महीला भगिनींना पात्र ठरवत निवडणुकीपूर्वीच त्यांच्या बँक खात्यावर राज्य सरकारने अनुदानाची रक्कम वर्ग केली होती. यामुळे राज्यातील लाखो महीला मतदार भगिनींनी भाजपा व मित्र पक्षांच्या उमेदवारांच्या पारड्यात भरभरून मतदान टाकले. परिणामी राज्यात भाजपा व मित्र पक्षांचे सरकार सत्तारूढ झाले. मात्र, ज्या महिला भगिनिंच्या बळावर सत्ता काबीज केली त्या लाडक्या बहिणींना जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार प्रतिमहा २१०० रुपये अनुदान न देता सध्या देण्यात येत असलेल्या १५०० रुपयांच्या अनुदानात देखील कपात करण्याचे पाप राज्यातील सत्ताधारी करत असल्याची टीका माजी आमदार गोरंटयाल यांनी केली आहे. विविध योजने अंतर्गत देण्यात येत असलेल्या अनुदानाचा लाभ घेत असल्याचे कारण पुढे करून राज्य सरकार भरभरून मतदान करणाऱ्या महिला भगिनींवर मोठा अन्याय करत असल्याचा आरोप गोरंटयाल यांनी केला आहे. निवडणुकीत केवळ मतदानासाठी वापर करून आता त्याच महीला भगीनिंच्या अनुदानात कपात करण्याचा उद्योग राज्य सरकारने तात्काळ थांबवावा आणि निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार लाडकी बहिण योजनेसाठी पात्र ठरलेल्या सर्वच महीला भगिनींना प्रतीमहिना २१०० अनुदान द्यावे अशी मागणी करत राज्य सरकारने त्यासाठी आवश्यक पाऊल उचलले नाही तर अन्याय झालेल्या लाडक्या बहिणींना सोबत घेऊन राज्य सरकार विरुद्ध आगामी काळात काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा स्पष्ट इशारा माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.

### शेतकऱ्यांना कर्जमाफी, मोफत वीज केव्हा देणार ?

**विधानसभा निवडणुकीत अनेक खोटी आश्वासने देऊन सता काबीज करणाऱ्या भाजपा मित्र पक्षांच्या नेत्यांना आता आश्वासनांचा विसर पडला की काय ? असा सवाल उपस्थित करून माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि मोफत वीज केव्हा देणार असा प्रश्न राज्य सरकारला विचारला आहे.लाडक्या बहिणींना थापा मारणारे हे सरकार निवडणूक जाहीरनाम्यात आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना देखील कर्जमाफी आणि मोफत वीज देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत लाडकी बहिण,शेतकऱ्यांसह सामान्य जनतेच्या हितासाठी लवकरच व्यापक आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिला आहे.**

## पटाया येथील भव्य विश्वशांती रॅलीत जालन्यातील सेवाभावींचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने दि. १ मे रोजी थायलंडमधील पटाया (थायलंड) येथे काढण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय शांती रॅलीत जगभरातून विविध देशांतील सेवाभावी सहभागी झाले. जालना येथून चार सेवाभावींनी सहभाग नोंदविला. जगात शांती, सद्भाव आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश पसरवणे हे या दिव्य शांती रॅलीचे उद्दिष्ट होते. या शांती रॅलीत भारताच्या विविध भागांतून ५०० तर महाराष्ट्रातून २५ सेवाभावी सहभागी झाले होते. बुऱ्हानपूर झोनमधून मंगला दीदी, कल्याण झोनमधून अलका दीदी यांनी रॅलीचे नेतृत्व केले. अकोला येथील रुक्मिणी दीदी, जालना शहरातून माजी नगराध्यक्ष सौ. कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना सौ. आशा मानधना, मध्यप्रदेशातील इंदौर येथून सुभाष माळी व मनोज गर्ग यांनी सहभाग नोंदविला. या रॅलीतील सहभागी सेवाभावींचे पटाया येथील मीरा दीदी व त्यांच्या सेवाभावी परिवाराने अत्यंत आत्मीयतेने स्वागत केले. पटाया येथील समुद्रकिनाऱ्यावर इव्हिनिंग वॉकसाठी देश-विदेशातील लाखो पर्यटक येतात. त्या अनुषंगाने या बीचवर शांती रॅली काढण्यात येऊन जागतिक शांततेचा संदेश देण्यात आला. विविध आध्यात्मिक सत्रे, ध्यानधारणा, सांस्कृतिक कार्यक्रम व जागतिक शांततेबाबतच्या चर्चांमधून ही रॅली अत्यंत प्रेरणादायी ठरली. सहभागी सेवाभावींच्या अनुभवाने, भक्तिभावाने व सेवेच्या निष्ठेने या रॅलीला एक आध्यात्मिक उंची प्राप्त झाली, असे सुनील लाहोटी यांनी सांगितले. या रॅलीच्या माध्यमातून मिळालेला शांतीचा संदेश सर्व सेवाभावी त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात पोहोचवतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

## कर्णकर्कश आवाज व प्रेशर हॉर्नमुळे शहराची शांतता भंग

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**
अंबड शहरात सार्वजनिक ठिकाणी वाजवल्या जाणाऱ्या डि.जे तसेच दुचाकी,चारचाकी आदी वाहनांना बसवलेल्या प्रेशर हॉर्नमुळे शहराची शांतता भंग पावली असून मोटार वाहन कायद्यानुसार प्रेशरहॉर्न वाजवणे प्रतिबंधीत असतांना देखील काही लोक आपल्या वाहनांना प्रेशरहॉर्न बसवतात प्रेशरहॉर्नचा अचानक आवाज आल्यास रस्त्याने चालना-या नागरिकांना, हॉस्पीटल मध्ये उपचार घेणाऱ्या रूग्नांना,-हदयविकार, दमा,बीपीचा त्रास असलेल्या लोकांना त्रास होतो. अचानक अपघात होवून अनेक निरपराध लोकांचा जीव जातो. शहरात फटाके फोडणा-या बुलेटची संख्या वाढलेली असून शासनाने एक महिन्यापुर्वीच कर्णकर्कश आवाजाबद्दल नियम लागु केला आहे मात्र शासनाच्या नियमांचे पालन होत नाही.सरकारने घालुन दिलेल्या आवाज मर्यादेचे पालन करण्यासाठी शहरातील शांतता टीकवून ठेवण्यासाठी कर्णकर्कश आवाजात वाजणारे डि.जे,प्रेशरहॉर्न, रात्रभर वाजणारे भोंगे यांच्यावर नागरिकांतून कारवाईची मागणी जोर धरीत आहे.

पारंपरिक वाद्यातुन निर्माण होणाऱ्या ध्वनीतुन मानसिक समाधान मिळते,चित्त स्थैर्य होते मात्र सतत कर्णकर्कश आवाजाच्या सानिध्यात राहिल्यास चिडचिड होते, कर्णबधिर होण्याची शक्यता असते सरकारने आवाजाचे मुल्यमापन डेसीबलमध्ये केले आहे एका मर्यादेपर्यंत लोक आवाज सहन करु शकतात मात्र आवाजाने मर्यादा ओलांडली की शांतता भंग पावते. कर्नकर्कश आवाजाचा माणसाबरोबर पशुपक्षी व किटकानाही त्रास होतो म्हणून सर्वांनी कर्णकर्कश आवाज टाळला पाहिजे.किमान रुग्नालय परिसरात होणारा कर्णकर्कश आवाज बंद करण्याची गरज आहे.

## अवैध वाळू वाहतुकीच्या शेकडो वाहनापैकी तीनच वाहनांवरच कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**



मंठा तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून रात्रंदिवस बेसुमार अवैधरित्या वाळू उपसा सुरू आहे. याकडे महसूल प्रशासन कानाडोळा का करत आहे. हे अद्याप कळायला मार्ग नाही. अवैद्य वाळू उत्खनन करणाऱ्या तीन वाहनावर शुक्रवार रोजी सकाळी तहसीलदार यांनी दुचाकीवर जाऊन कार्यवाही केल्याची माहिती प्रतिनिधींना प्राप्त झाली आहे. याप्रकरणी मिळाली माहिती अशी की , मंठा तालुक्यातील उस्वद - देवठाणा येथील नदीपात्रात अवैधरित्या वाळू उत्खनन करून ती वाहतूक करणाऱ्या प्रत्येकी दोन ब्रास क्षमतेच्या तीन वाहनांवर कारवाई करण्यात आली. संबंधित वाहने महसूल विभागाच्या पथकाने पकडून तहसील कार्यालयाच्या शासकीय गोदामात जमा केली आहेत. यात पुन्हा एक विशेष आहे की , महसूल प्रशासन या कार्यवाहीत असलेल्या वाळू माफियांची नावे सांगण्यास टाळाटाळ करत आहे.

सदर कारवाई तहसीलदार सोनाली जोंधळे , मंडळ अधिकारी शीकांत गादेवाड, संजय उफाड , तलाठी भवाळ ,तलाठी तमशेटे , तलाठी एस के पाटील , पोलिस कॉन्स्टेबल साळवी, कोतवाल मगर, वाहनचालक , दत्ता लवंगारे यांनी ही कार्यवाही केली.या कारवाईमुळे अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. महसूल विभागाकडून पुढील तपास सुरू आहे. मंठा शहरासह तालुक्यातील पूर्णा नदी पात्रासह पाटोदा नदीतून अवैधरित्या वाळू उपसा करून मंठा शहरासह तालुक्यात ठीक ठिकाणी वाळूचा अवैध साठा केला आहे. नागरिकांच्या मागणीनुसार जादा दराने अवैध्यरीत्यारेती पुरविली जाते. यामुळे रेतीमाफीया गब्बर झाले असून पत्रकार व सर्वसामान्यांना देखील यांचा त्रास वाढला आहे.तर तालुक्यातील अधिकाऱ्यांना देखील वाळू माफिया काही जुमानत नाहीत. मागील आठवड्यामध्ये एक घटना समोर आलेली आहे मंठा तालुक्यातील पाटोदा येथे सेलू येथील पोलीस अधिकारी यांच्यावर दहा ते पंधरा जनाच्या टोळीने माफीयांनी हल्ला केल्याची घटना ताजी आहे. असेच जर राहिले तर मंठा तालुक्यात माफिया राज आल्याशिवाय राहणार नाही. याला कारणीभूत केवळ प्रशासनच आहे अशी नागरिकात चर्चा होत आहे.

# जातीनिहाय जनगणनेचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल आमदार बबनराव लोणीकर यानी मानले पंतप्रधान मोदी यांचे आभार

### खुल्या प्रवर्गासह, ओबीसी, बारा बलुतेदार, अठरापगड जातींची जनगणना केली जाणार- आमदार लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून या माध्यमातून सर्वसामान्य दीन, दुबळा, वंचित घटकाला न्याय देण्यासाठी ही जात निहाय जनगणना महत्वपूर्ण ठरेल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांची दर ११ वर्षांनी जनगणना केली जाते यापुढे खुल्या प्रवर्गासह ओबीसी बारा बलुतेदार आणि अठरापगड जातीच्या जनसंख्येची मोजणी यामध्ये केली जाणार आहे, जी बाब पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू इंदिरा गांधी राजीव गांधी मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात होऊ शकली नाही ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करून दाखवली त्याबद्दल आमदार बबनराव लोणीकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

मागील अनेक वर्षापासून देशभरातील नागरिकांची जातीनिहाय जनगणना करण्यासंदर्भात मागणी असताना काँग्रेस सरकारने मात्र या मागणीकडे दुर्लक्ष केले. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. कल्याणकारी योजनांची आकडेवारी उपलब्ध असेल तर जातनिहाय जनगणना फायदेशीर ठरेल. कल्याणकारी योजनांमध्ये वाढ होईल आणि त्यांच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा होईल. जातनिहाय जनगणनेतून मिळणाऱ्या आकडेवारीनंतर सामाजिक परिस्थिती लक्षात घेता कोणत्या समाजाची किती लोकसंख्या आहे तसेच समाजातील संसाधनांमध्ये कोणाचा किती वाटा आहे हे समजण्यास मदत होईल. असेही आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले.

जेव्हा सर्व जातींबद्दल अचूक आकडेवारी आणि माहिती उपलब्ध असेल, तेव्हाच वंचित घटकांना न्याय देणे अधिक सोयीचे होईल आणि हे फक्त जातनिहाय जनगणना करूनच साध्य होऊ शकेल. तसेच कल्याणकारी योजनांचा लाभ वंचित गटांपर्यंत पोहोचला पाहिजे आणि वंचित गट निश्चित करण्यासाठी देखील जातनिहाय जनगणना उपयुक्त आहे, असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.



## किराणा व्यापाऱ्याच्या घरी पंचवीस तोळे सोन्याच्या दागिन्याची चोरी ; रिकवरी मात्र आठ तोळ्याची

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**
मंठा शहरातील मेन रोडवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील किराणा व्यापारी मोहन अग्रवाल यांच्या घरी शनिवारी रात्री चोरी झाल्याची घटना समोर आली. यात चोरी गेलेल्या २५ तोळे सोन्याच्या दागिन्यापैकी आठ तोळ्याचे दागिने रिकव्हर झाल्याची माहिती पोलिसांनी पत्रकारांना दिली. परंतु २५ पैकी आठ तोळेच कसे रिकव्हर होतात बाकी का नाही ? यासह तपासामध्ये १२ सराफा व्यापारी आणि दोनच व्यापारी कागदावर घेतले , बाकीच्यांना का सुट अशी देखील चर्चा शहरात होत आहे. याप्रकरणी सविस्तर वृत्त असे की , मंठा शहरातील मोहन किराणा या दुकानांमध्ये काम करणाऱ्या नोकराने २५ तोळ्याचे सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात सचिन उर्फ बबलू घोडे राहणार पांगरी बुद्रुक याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीचा घटनेनंतर पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे व त्यांचे सहकारी पोलीस कॉन्स्टेबल विलास कातकडे यांच्याकडे तपासाची सूत्रे आली. त्यानंतर यांनी तपासाची सूत्रे फिरवून मंठा शहरातील १२ सराफा व्यापारी यामध्ये असल्याची दिवसभर चर्चा व त्यांना देखील पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलवून घेतले होते. तसेच आरोपी सचिन घोडे यास मदत करणारे वाघमारे दांपत्य त्यांना देखील पोलिसांनी चौकशीसाठी बोलून घेतले यासह सचिन घोडे याच्या अन्य साथीदार वाघमारे दांपत्ये , गवळी , वायाळ , शिवपुरे यांची देखील चौकशी झाली. या सर्व चौकशीनंतर पोलिसांना आठ तोळ्याची रिकवरी प्राप्त झाली. मात्र २५ तोळे लंपास दागिन्यापैकी आठ तोळ्याची रिकवरी कशी , यासंदर्भात विविध चर्चा शहरात रंगत आहे. यासह या प्रकरणांमध्ये सराफा व्यापारी यांना आरोपी न करता साक्षीदाराच्या यादीत टाकले जाते तसेच यात घोडे यांना सहकार्य करणाऱ्या सर्व जणांना पोलिसांकडून क्लीन चीट देण्यात येते हे मात्र संशयास्पद दिसते !

या प्रकरणांमध्ये नागरिकांच्या विविध चर्चेने पोलीस प्रशासनाची प्रतिमा अत्यंत मलीन होताना दिसत आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या प्रकरणांमध्ये विशेष लक्ष घालून सदर तपास हा स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा अशी मागणी होत आहे. या अगोदर देखील अनेक चोरीच्या घटना घडल्या आहेत त्याचा देखील तपास असाच गुलदस्त्यात आहे.

# आ . लोणीकर तुम्हीच प्रत्यक्ष कामांची पाहणी करुण वैजोडा रहिवासियांना न्याय द्यावा !

**तुमच्या मागेपुढे फिरणारा गुत्तेदार गिरी पक्षाचा पदाधिकारी असल्याचा सांगून अधिकाऱ्यांना करतो दमदाटी सऱ्हास उचलतो बोगस बिले ?**

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**



आ . बबणराव लोणीकर

परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील मातोश्री पांदन रस्ता सण २०२३/२४ मध्ये हा पांदन रस्ता गुत्तेदार रामप्रसाद गिरी यांनी मंजुर करूण आणला होता . हा पांदन रस्ता पाणी पुरवठा पाण्याची टाकी ते नृसिंह भाऊराव कवडे यांचे शेत ते विठ्ठल रामदास जाधव यांचे शेत तर पुन्हा नितीन पुरी यांचे शेत असा थोडक्यात पांदन रस्ता आहे .मात्र थातुर मातुर रस्त्यावरील खड्डे मुरुमाने बुजविले व रोहयो अंतर्गत रस्त्याच्या कामाचे बिले काढण्याचा जणु सपाटाच लावला होता . भाजपयुमोचा उपाध्यक्ष सांगुन अभियंता , ग्रामसेवक यांना दमदाटी करूण संबंधीत पांदन रस्त्याचे कामे न करता बोगस बिले उचलली आहेत . तसेच वैजोडा ग्रामस्थांनी हा पांदन रस्ता करणेकरिता गुत्तेदार गिरी यांच्या विरोधात अनेक वृत्तपत्रात बातम्या छापून आल्या तसेच साखळी उपोषण कली मात्र तात्काळ रस्ता करतो म्हणून हप्ताभर चाललेले उपोषण ग्रामस्थांनी गुत्तेदार गिरी तथा तात्कालीन गट विकास अधिकारी यांच्या लेखी स्वरूपात असलेल्या कागदोपत्री नोंद पुरावा म्हणून उपोषण तासाभरात मागे घेतले गेला पावसळा उलटला पुन्हा पावसाळा तोंडावर आला तरी गुत्तेदार तथा भाजपचा पदाधिकारी म्हणून घेणाऱ्या रामप्रसाद गिरीने काही न करता पांदन रस्त्याची बिले स्वतःच्या हितापोटी उचलले गुत्तेदार गिरी तथा सरपंच पुत्राने सुत्र हाती घेत वैजोडा ग्रामपंचायतीत शाषकीय कांमात भ्रष्टाचारांचा कळस गाठला आहे . आमदार बबनराव लोणीकर तुम्हीच

### आ .बबणराव लोणीकर गुत्तेदार गिरीला वेळीच वेसन टोचा ग्रामवासीयांचा टाहो ..!

पुढील चार पाच दिवसांत गुत्तेदार गिरीने संबंधीत पांदन रस्त्याचे कामे न केल्यास अभियंता भंडे तथा गुत्तेदार गिरी यांनी जाणीवपुर्वक चिरिमिरी घेऊन गुत्तेदार गिरी यांना बोगस बिले अदा केली यांच्यावर दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात यावे .अशी मागणी वैजोडा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे .



गुत्तेदार रामप्रसाद गिरी

या मतदारसंघाचे भाग्यविधाते असून विकासपुरुष आहात आत्तापर्यंतच्या विधानसभा निवडणुकीत या गावाने भरघोष मते तुमच्या पारड्यात टाकले आहे तर तुम्हाला दिडशे ते दोनशे मतांची लिड देणार हे गाव आहे .आत्ता तुम्हीच या स्वयंघोषीत भाजयुमोच्या पदाधिकाऱ्यांच्या कामांची चौकषी करूण वैजोडा येथील पांदन रस्ता करूण मौजे वैजोडा ग्रामस्थांना न्याय द्यावा . अशी हाक मौजे वैजोडा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे .

# शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके यांची कमतरता भासू देऊ नका : पालकमंत्री सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०२ मे-**

नांदेड जिल्ह्याला खरीप हंगाम २०२५ साठी एकुण ७ लाख ७६ हजार ७६२ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित आहे. या खरीप हंगामात शेतकऱ्यांना पेरणी करण्यासाठी बि-बियाणे, खते, किटकनाशके यांचा पुरवठा करण्यास कमतरता भासू देऊ नका, अशी सूचना राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली. ख्ररीप हंगाम २०२५ पुर्व तयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार भिमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार आनंदराव तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत तसेच विविध संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती.



खरीप हंगामात शेतकऱ्यांना बि-बियाणे पुरवठा व्यवस्था योग्यरितीने करावा, त्यांना बियाणे व किटकनाशकांची उपलब्धता वेळेत होईल याचे नियोजन कृषी विभागाने करावे. जिल्ह्यातील बोगस बि-बियाणे पुरवठा करणाऱ्यांवर कडक कार्यवाही करा, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांची जास्तीत जास्त माहिती होण्यासाठी कृषी विभागाने व्हॉटसअप ग्रुप तयार करुन त्याद्वारे त्यांनी आवश्यक माहिती पोहोचवावी. कृषी क्षेत्रात एआयचा वापर करुन शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावे असेही निर्देश त्यांनी दिले. ज्या बँका शेतकऱ्यांना पिक कर्ज देण्यास टाळाटाळ करतात त्यांना शासनाकडून देण्यात येणारी सवलत कमी करण्याबाबतही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात पिकविमा अनेक तालुक्यामध्ये खूप कमी अधिक प्रमाणात वितरीत होत आहे. याबाबत तालुका स्तरावर नियोजन असावे. शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी सोडविण्यासाठी तालुका पातळीवर व्यवस्था करावी, अशी मागणी खासदार अशोक चव्हाण यांनी केली. तसेच विमा कंपनीने आतापर्यत किती रक्कम वितरीत केली, अजून किती रक्कम येणे शिल्लक आहे याची वर्षनिहाय माहिती द्यावी. उत्पादन वाढीसाठी एआयचा वापर, जिल्ह्यात जलसंधारण व जलसंपदाच्या मंजूर प्रकल्पांना निधी उपलब्ध व्हावा, जिल्ह्यात मक्याचे क्षेत्र वाढावे यासाठी उपाययोजना आखाव्यात अशा सूचना खासदार अशोक चव्हाण यांनी केल्या. यासोबत त्यांनी अर्धापूर व मुदखेडला केळी निर्यात सुविधा केंद्र व धर्माबादला मिर्ची संशोधन केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला.

नांदेडला सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरु करावे तसेच शेतकऱ्यांच्या समृध्दीसाठी नांदेड जिल्ह्यात आयसीएआरचे केंद्र उभारण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केली.

प्रास्ताविकात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी पीपीटीद्वारे जिल्ह्यातील खरीप हंगामासाठी केलेल्या पुर्वतयारीच्या नियोजनाची माहिती दिली. सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते कृषि मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी राज्यस्तर प्रथम क्रमांक विजेते माधव शंकरराव पाटील रा. चैनपूर ता. देगलूर व सुनिल नामदेव चिमनपाडे रा. कुडली ता. देगलूर यांना द्वीतीय क्रमांक मिळाल्याबाबत त्यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्ह्यातील आतापर्यत अवयवदान केलेल्या दात्यांच्या कुटूंबियांचा सन्मान पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये चंद्रकला रावळकर, भाग्यश्री संतोष मोरे, सोनाली भुजंग मस्के, नामदेव दादाराव पवळे, लक्ष्मीबाई पवळे, शोभा सुर्यकांत साधु व डॉ. दिपक साधु, प्रिया अभिजीत ढोके यांचा सन्मान करण्यात आला. अवयवदानाची शपथ पालकमंत्र्याच्या हस्ते उपस्थितांना देण्यात आली.

जिल्ह्यातील ७ विद्यार्थी युपीएससी परिक्षेत उत्तीर्ण झाले असून या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये कृष्णा जाधव पाटील, सुनिल रामलिंग स्वामी, आयुष कोकाटे, वेदांत माधव पाटील उंचेकर, अतुल अनिल राजूकर, शिवराज गंगावळ, आनंद सदावर्ते यांचा व त्यांच्या पालकांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त

### शिक्षणासाठी दर्जेदार चित्रफीत स्पर्धेत शिक्षिका श्वेता आलोणे प्रथम प

**तामसा** -शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे शिक्षण विभाग अंतर्गत शिक्षणासाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती वर्ग पहिली दुसरी भाषा विषयासाठी साठी उपक्रम स्पर्धे अंतर्गत हदगाव तालुक्यामधील जिल्हा परिषद आदर्श शाळा उमरी जहागीर शाळेतील उपक्रमशील शिक्षिका श्वेता शेषराव आलोणे त्यांच्या व्हिडिओला प्रथम क्रमांक मिळाला असून अर्चना भारत इटकरे जिल्हा परिषद शाळा रुई धानोरा यांना द्वितीय क्रमांक व कल्पना किशन खर्चे जिल्हा परिषद शाळा पिंपळगाव यांना तृतीय क्रमांक व्हिडिओ निर्मितीमध्ये मिळालेला आहे . जिल्हा परिषद शाळा तळणी शाळेतील कुलदीपक वाघमारे व समर्थ विद्यालय चे नारायण भारती यांना सुद्धा दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड येथे त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देण्यात आले या स्पर्धेत यश संपादन केल्याबद्दल शिक्षकयाबद्दल हादगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी किशन फोले , शिक्षण विस्तार आधिकारी बाच्चे , गुणवंत काळे , केंद्रप्रमुख गामोड ,उमरी ज. च्या सरपंच सौ संध्याताई सदाशिवराव अमृते, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आनंदराव गुडमुडके व सर्व सदस्य,केंद्रीय मुख्याध्यापक टिबे आदर्श शाळा उमरी जहागीर चे मुख्याध्यापक सोनबा दवणे व सर्व शिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### भोकर येथे जयंती मिरवणूकित खिचडीचे वाटप

**भोकर** -भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या भव्य मिरवणूकित राष्ट्रवादी काँग्रेस ओबिसी प्रदेश उपाध्यक्ष बालाजी पाटील गौड यांचेकडून खिचडीचे वाटप करण्यात आले. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आले त्यानंतर खिचडी वाटपाच्या कार्यक्रमास सूरु करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा.रावणगावकर माजी उपसभापती सूरेश बिल्लेवाड पो.नि.अजित कूंभार एल.ए.हिरे जयंती मंडळाचे अध्यक्ष जयभिम पाटील मिलींद गायकवाड आनंद ढवळे परसराम पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वीतेसाठी कांतीलाल जोंधळे संभाजी धात्रक प्रशांत हनमंते संतोष एलगूंडे दिगंबर कदम शेख फारुख शेख नय्यूम बशीर बागवान बालाजी गोपतवाड जगन बूट्टनवाड विश्वनाथ गटकेपोड धम्मा कदम अरविंद कांबळे राहूल सोनकांबळे यांचेसह अनेकांनी परिश्रम घेतले.

### पत्रकार गंगाधर सोनटक्के यांना समग्र सोशल फाउंडेशनचा समाजभूषण पुरस्कार जाहीर.

**अर्धापूर**-समग्र सोशल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर संस्थेच्या वतीने अर्धापूर तालुक्यातील लोणी (बु) येथील पत्रकार गंगाधर घनश्याम सोनटक्के यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दिनांक ४ मे रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह सन्मित्र कॉलनी रॉक्सी टॉकीज, शेजारी पैठण,गेट छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहीर होताच पत्रकार गंगाधर सोनटक्के यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छाचा वर्षा होत आहे. अर्धापूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गंगाधर सोनटक्के ही नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात तसेच आपल्या लेखणी द्वारे वर्तमानपत्रातून गोरगरिबांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवितात. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना दोन महिन्या पुर्वी आदिलाबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते. त्यातच आता छत्रपती संभाजीनगर येथील समग्र सोशल फाउंडेशन च्या वतीने सामाजिक कार्याची दखल घेत.त्यांना समाजभूषण पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. दिनांक ४ मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह सन्मित्र कॉलनी रॉक्सी टॉकीज शेजारी पैठण गेट छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहिर झाल्याचे कळतात मराठी पत्रकार परिषद संघाच्या वतीने गंगाधर सोनटक्के यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच त्यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

### माध्यमिक आश्रम शाळेत महात्मा बसवेश्वर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती साजरी

**नायगाव**- तालुक्यातील मरवाळी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक ज्यू तथा पोस्ट बेसिक ज्यू.कॉलेज मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली प्रथमतः प्राचार्य विजय कुमार देशमुख यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर,राष्ट्रसंत तूकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पअर्पण करीत अभिवादन केले. तद्नंतर शाळेतील सर्व शिक्षक व प्राध्यापक वृंदानी ही सामुहिकपणे पुजन करुन अभिवादन केले. यावेळी शाळेतील प्राचार्य विजयकुमार देशमुख,नामदेव राठोड,आकाश सूर्यवंशी ,सुभाष कदम,सुर्यकांत जाधव ,रघुनाथ कल्याण ,सतीश हाणमंते,धोंडीबा तेलंग, प्रदिप लाभशेटवार, यादवराव कोरनुळे , काशिनाथ बन,गणेश मारताळेकर, एकनाथ मुनगिलवार महेंद्र सारवले, दीपक बि-हाडे , गजानन श्रीरामे, नागोराव गबाळे, शंकर राठोड,सचिन राठोड,दिलीप गोरे, विश्वनाथ स्वामी, बालाजी माळगे,संभाजी मेहेत्रे,शिवशंकर कोरे,सुभाष राठोड,आनंदराव सूर्यवंशी, अवचित शेजूळ,व्यंकट रेकुळवाड, साहेबराव येवरे,व शिक्षकेत्तर कर्मचारी उत्तम राठोड,शिवाजी नारे,हाणमंत सिंगवाड आदी उपस्थित होते.

### संदिप केदारे यांचे निधन

**मुदखेड**- मुदखेड तालुक्यातील बारड येथील रहिवासी संदिप गणपत केदारे यांचे दि.०१ मे २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधी दि.०१ मे २०२५ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता नांदेड रोड बारड येथील स्मशानभूमीत करण्यात आले. त्यांच्या पश्चात,पत्नी दोन मुल,एक मुगली आसा मोठा परीवार आहे. लोकस्वराज्य आंदोलनाचे मूदखेड ता.अध्यक्ष पोचिराम केदारे यांचे मोठे बंधू होत.

# पाण्यासाठी मनपा कार्यालयावर महिलांचा घागर मोर्चा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०२ मे-**



सिडको क्षत्रिय कार्यालयाच्या भोंगळ कारभारामुळे सिडकोतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी समस्याला तोंड द्यावे लागत आहे गेल्या पंधरा दिवसात सिडको हडको येतील नळाला पाणी येत नसल्यामुळे सततच्या निर्जळीला कंटाळून सिडकोतील महिलांनी मनपाचे क्षेत्रीय कार्यालयावर दिनांक २ मे रोजी संतप्त महिला व जनसमुदायांनी घागर मोर्चा काढून मनपाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे व प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

नांदेड वाघाळा शहर महापालिका नांदेड अंतर्गत सिडको क्षेत्रीय कार्यालय येथील सिडको परिसरात पिण्याच्या पाणी गेल्या पंधरा दिवसापासून येत नसल्याने सिडको हडकोतील महिला व नागरिकांनी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांना घेरावा घालून त्यांच्या अंगावर भांड्याने पाणी ओतून संतप्त कार्यकर्त्यांनी निष्काळजी प्रशासनाचा निषेध करण्यात आला. यावेळी इंजि. प्रकाश कांबळे, झोनचे कार्यालयीन अधीक्षक विलास गजभार हे होते.याप्रसंगी घागर मोर्चाचे नेतृत्व सिडकोतील कार्यकर्ते संजय घोगरे, वैजनाथ देशमुख, राजू लांडगे, संजय इंगेवाड, धीरज स्वामी, सतीश बसवदे, डॉ. ललिता बोकारे, विजयाताई घोडघासे,नारायण कोलंबीकर, नितीन वाघमारे, डि.के.कांबळे यांच्यासह शेकडो महिलांनी खुली भांडी घेऊन प्रशासनाचा निषेध केला. याप्रसंगी क्षेत्रीय कार्यालयात जबाबदार अधिकारी एकही नव्हते आणि येथील सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांच्याकडे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी महत्त्वाची खाती दिल्याने सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यास वेळच मिळत नाही. सहाय्यक आयुक्त पूर्णवेळ मुख्य कार्यालयात असतात पाच ते सहा या दरम्यान किंवा वेळ मिळेल तेव्हा सिडकोकडे वसुलीसाठी येत असतात तेव्हा तुटपुंजा वेळ दिल्याने सिडकोतील नागरिकांच्या समस्या सुटणार आहेत का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला. आयुक्त डॉ . महेश कुमार डोईफोडे यांनी सिडकोला पूर्ण वेळ काम करणारा अधिकारी देण्यात यावा अशी नागरिकांची मागणी होत आहे. कार्यालयात कामानिमित्त आलेल्या भोगवटदाराना अधिकारी भेटत नाही कार्यालयाच्या बंद वेळेच्या वेळेपासून अधिकाऱ्यांचा वेळ सुरू होतो. हे सामान्य नागरिकांना माहीत नसते अशा प्रकारच्या भोंगळ कारभारामुळे संतप्त सिडकोकरांना गेल्या पंधरा दिवसापासून पाणी न सुटल्याने तारेवरची कसरत करावी लागत आहे. म्हणून या प्रशासनाच्या निषेधार्थ घागर मोर्चा काढून अधिकाऱ्यांच्या अंगावर भाड्याने पाणी ओतले यामुळे यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी जमावांना शांत करून मनपा अधिकारी यांना ताबडतोब पाणी सोडण्यास सांगितले तेव्हा पाण्याच्या मोटर नादुरुस्त असल्याने पाणी कमी दाबाने का होईना पण एका तासात सोडण्यात आले व सोमवारपासून पूर्वत पाणी योग्य वेळात सोडण्यात येईल असे आश्वासन दिले.

# पी.एम.पी एल. कंपनीचा गौण खनिज परवाना रद्द

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ०२ मे-**

बहुप्रतीक्षेत असलेल्या वर्धा -यवतमाळ- नांदेड या रेल्वे मार्गाचे कामासाठी संबंधित पी.एम.पी.एल. या तेलंगणा स्थित कंत्राटदाराने २०७ ते २५३ या कामासाठी आझादी अमृत महोत्सव अंतर्गत नवीन शेततळे निर्मितीतून गौण खनिज उत्खनन परवानाचे नियमांना अक्षरशः पायदळी तुडवीत रात्री बे- रात्री मोठ्या जेसीबीच्या साह्याने उत्खनन करत असल्याची रीतसर तक्रार पुराव्यासह प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख अनिल कदम यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर संबंधित विभागाने तहसीलदार हदगाव यांना एक पत्र काढून संबंधित कंपनीचा गौण खनिज परवाना रद्द करून यंत्रसामग्री जप्त करून प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार व शासन निर्णयानुसार चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश करण्यात आले असून तहसीलदार यांच्या कारवाईकडे तालुक्याचे लक्ष लागून आहे.

सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात असलेल्या पीएमपीएल कंपनीने गौण खनिज वाहतुकीचे नियमांना बगल देत वाहतूक केली. त्याचा नाहक फटका वन्यजीवांना बसला असून त्यामुळे कित्येक वन्यप्राणी मृत्युमुखी पडले होते. संबंधित कंपनीने मौ. कवाना गट क्र.१२, मौ.मनाठा गट क्र. २९०, मौ. अंबाळा गट क्र.७४/ब/१,व ७४/ब/२ या ठिकाणाहून मुरूम परवाना मंजूर करण्यात आला होता परंतु संबंधित कंत्राटदाराने अटी व शर्तीतील क्र.८ व ९ या मुद्द्याचा भंग करून रात्रीच्या वेळेस मोठ्या जेसीबी मशीन च्या साह्याने बेकायदेशीर उत्खनन करून हायवा व टिप्परच्या साह्याने वाहतूक करून परिसरातील नागरिकांच्या जीवतास व आरोग्याच्या धोका उत्पन्न करून चोरी करत असल्याची तक्रार पुराव्यासह अनिल कदम यांनी केली होती.

# आ. चिखलीकर यांच्या निवासस्थानी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०२ मे-**

जगाला शांती आणि समतेचा संदेश देणारे जगतज्योती महात्मा बसेश्वर यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर , माजी आमदार ओम प्रकाश पोकर्णा , प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दिव्यांग सेल कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, प्रदेश संघटक सचिव मुक्तेश्वर धोंडगे, माधव पावडे, युवक जिल्हाध्यक्ष बालाजीराव शिंदे, युवक प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, मोहसीन खान पठाण आदी उपस्थित होते.

# चक्रधर कळणे यांचे आमरण उपोषण मागे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ०२ मे-**

तालुक्यातील सरेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या कसुरदार शिक्षकांवर कारवाई करण्यात यावी म्हणुन चक्रधर कळणे पाटील यांचे चौथे आमरण उपोषण दि. ३० एप्रिल रोजी पंचायत समिती कार्यालयाच्या गेट समोर बसले होते.

चक्रधर कळणे यांनी प्रशासनाला वारंवार निवेदने आमरण उपोषणे, आत्मदहणाचा इशारा,धरणे आंदोलन, करून सुद्धा त्यांना न्याय मिळाला नाही म्हणुन परत एखदा पंचायत समिती कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसले होते. कसुरदार शिक्षक दोषी असल्याचे पुरावे प्रशासनाला देऊनही कसुरदार शिक्षकांवर प्रशासन कारवाई का करित नाही. शिक्षकांना पाठीशी घालण्याऱ्या आधिकाऱ्यावर तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास गुन्हे दाखल करा. जो पर्यंत मला न्याय मिळणार नाही तोपर्यंत माझे उपोषण मागे घेणार नाही असे उपोषणकर्ते चक्रधर कळणे पाटिल यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले. परंतु पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, नायब तहसीलदार मारोतराव जगताप, गटशिक्षणाधिकारी प्रिया डहाळे, विस्तार अधिकारी सुरेश पाटील, विशेष शाखेचे पोहेकॉ किशोर पाटील यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेतले.



# किनवट येथे सामूहिक उपनयन संस्कार सोहळा उत्साहात



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०२ मे-**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने तिसऱ्या सामूहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन किनवट येथील गजानन महाराज मंदिर संस्थानच्या सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात एकूण ९ बटूंवर पारंपरिक विधींसह उपनयन संस्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे पौराहित्य भागवताचार्य श्री. दिनेश महाराज कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पवन बोराळकर गुरुजी यांनी केले. यावेळी रुषिकेश जोशी, रोहित पांडये, सार्थक पत्की गुरुजी आणि बंडु महाराज गुरुजी हे मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास आमदार भिमराव केराम, भाजप नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार, व्यंकटराव नेम्मानिवार, आनंद मच्छेवार, पवार गुरुस्वामी, मुकुंद लोखंडे, अशोक नेम्मानिवार, श्रीनिवास नेम्मानिवार, अभय महाजन, शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत क-हाळे, माजी शहराध्यक्ष सतिष बिराजदार यांची विशेष उपस्थिती होती.

ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातुरकर यांनी समाजहितासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. उपनयन संस्काराच्या निमित्ताने किनवट व माहूर तालुक्यातील ब्राह्मण समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भागवताचार्य दिनेश महाराज कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून उपनयन संस्काराचे धार्मिक व सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. मानव जीवनात वेगवेगळ्या संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यापैकी उपनयन संस्कार हा आत्मज्ञान आणि जबाबदारीच्या प्रारंभाचे प्रतीक आहे, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे किनवट तालुका अध्यक्ष आशिष देशपांडे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने अतिशय परिश्रमपूर्वक नियोजन केले. विशेष म्हणजे, या उपक्रमासाठी कोणत्याही इतर समाजाकडून आर्थिक किंवा अन्य स्वरूपाचे सहकार्य न घेता, पूर्णपणे ब्राह्मण समाजाच्या सहभागातून कार्यक्रम पार पडला. सलग तीन वर्षांपासून हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात येत असून, समाजामध्ये संस्कारांची जपणूक करण्याचा हा प्रयत्न सर्वस्तरावर कौतुकास्पद ठरत आहे.

# भगवान परशूराम जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ०२ मे-**

येथील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा तर्फे भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

भोकर शहरातील भगवान परशुराम चौकात ध्वजारोहण करण्यात येवून भगवान परशुराम यांच्या तैलचित्राचे पुजन करण्यात आले. चौकातील नाम फलकाला पुष्पहार अर्पण करून भगवान परशुरामाचा जयघोष करण्यात आला.याप्रसंगी ब्राह्मण समाज बांधवांनी परशुराम जयंती निमित्त सर्व समाजबांधवांना शुभेच्छा देत प्रसाद व थंड पेयाचे वाटप केले. यावेळी गोविंद राखे,बाळा साकळकर,अनंता जोशी,नितीन चौधरी,श्रीकांत देव,संतोष जोशी,विनय पांडे आदिसह इतर समाजबांधव उपस्थित होते.

# पहलगाम अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ हाणेगाव कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**हाणेगाव, दि. ०२ मे-**



हाणेगाव येथे जम्मु काश्मीर मधील पहलगाममध्ये झालेल्या अतिरेकी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवार दिनांक २ रोजी सकल हिंदु समाजाच्या वतीने संपूर्ण बाजारपेठ बस स्थानक परिसर कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी १०८ शंकरलिंग शिवाचार्य महाराज,पंचायत समितीचे माजी सदस्य तथा देगलूर तालुक्याचे भारतीय जनता पक्षाचे तालुकाअध्यक्ष प्रीतम देशमुख, विवेक पडकंठवार, बालाजी इंगळे, शिवकांत आप्पा माळगे, रतिकांत होडगे, बालाजी चोपडे संतोष भालके, यादव सूर्यवंशी, अशोक पटणे, राजकुमार आचारे, रमाकांत फुलारी, युवराज स्वंतकर, उमाकांत होडगे, महादेव उपे, अंगद कुडले, प्रशांत पाटील, संजय काडगे, शशिकांत पटणे,धनाजी नाईकवाडे,सुधाकर नाईकवाडे,संतोष भालके,संतोष बलशेटवार यांच्यासह परिसरातील व्यापारी व नागरिक उपस्थित होते यावेळी आनेक नागरीकांनी देशभक्तीपर विचार मांडले आणि पाकीस्तान व आतंकवादी विरोधात घोषणा देऊन निषेध व्यक्त केले तर सदरील निषेध शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस ठाणे मरखेलचे पोलीस निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी सूर्यवंशी, जमादार दत्ता पाटील, रवींद्र घुले , पी,पी पांढरे, नामदेव दोसलवार, डी एन सावंत, मधुकर केंद्रे यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्य१ात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी सूर्यवंशी, जमादार दत्ता पाटील, रवींद्र घुले , पी,पी पांढरे, नामदेव दोसलवार, डी एन सावंत, मधुकर केंद्रे यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अतिक्रमण करणाऱ्या इस्लापूर येथील ग्रा. पं. सदस्याचे सदस्यत्व रद्द

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ०२ मे-**

इस्लापूर येथील ग्राम पंचायत सदस्य तुकाराम बोनगीर यांनी रस्त्यावर बांधकाम करून अतिक्रमण केले, अशी तक्रार एका नागरिकांनी केल्याने त्यांचे सदस्य पद संचिका क्रमांक २०२४/जिबी-१/ डेस्क - १/ग्रापनी / टे १६/सिआर- १०० २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांनी केलेले अतिक्रमण सिद्ध झाल्याने संबंधित सदस्याचे ग्रामपंचायत सदस्यपद अनर्ह ठरवण्यात आले.

सन २०२४ च्या कालावधीमध्ये इस्लापूर ग्राम पंचायतीचे सदस्य यांनी घरालागत असलेल्या ग्राम पंचायतच्या

रस्त्यावर दहा बाय दहाचे सिमेंट काँक्रीटचे पक्के बांधकाम करून खोली काढण्यात आली. त्यामुळे सदरील रस्ता कमी झाल्यामुळे रस्त्याची अडचण होत असलेले शेख अक्रम शेख मुस्तफा यांनी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली. परंतु ग्राम पंचायतने वारंवार चालढकल केल्यामुळे सदरील तक्रारदारअ आक्रम यांनी शेवटी जिल्हा अधिकाऱ्याकडे सविस्तर तक्रार करून न्याय मागितला असता सदरील प्रकरणाची शाहनिशा करून अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाले त्यावरून २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांनी तुकाराम बोनगीर यांचे ग्रा.पं.चे सदस्यत्व रद्द केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परळीत आज काँग्रेसचा सद्भावना संकल्प सत्याग्रह

**प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा. रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेस नेत्यांचा सहभाग**
**परळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-बहादुरभाई**

परळी प्रतिनिधी

राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक ३ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे अदी नेते पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.



राज्यात नुकत्याच घडलेल्या विविध घटनांनी राज्यातील सामाजिक शांतता भंग करण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी राज्यात काही शक्ती जाणीवपूर्वक वातावरण बिघडवून महाराष्ट्र अस्थिर व अशांत ठेवण्याचे पातक करत आहेत. दुर्दैवाने या विघातक शक्तींना सत्तेतून आशिर्वाद मिळत आहे. परंतु काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष बहादुरभाई परळी यांनी केले आहे.

# प्रा.अब्दुल अजीज अन्सारी यांचा सेवागौरव सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ मे**

म.शि.प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक अब्दुल अजीज अन्सारी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने सेवागौरव करण्यात आला. यावेळी म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, विजयकुमार सोळंके, ॲड.बी .आर. डक,सत्यप्रकाश रुद्रवार ,डॉ सुनील गरड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. अन्सारी यांच्या सेवागौरव निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. के सानप, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. लतीफ पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की प्रा. अन्सारी यांची ओळख विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आहे.त्यांनी प्रमाणितपणे सेवा केली अध्यापन व प्रशासकीय कामातील त्यांच्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला झाला. त्यांनी महाविद्यालयात काम करत असताना नोकरी न समजता सेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडले. यावेळी सेवपूर्ती निमित्त बोलताना प्रा. अन्सारी म्हणाले की, म. शि. प्र.मंडळात शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो. ग्रामीण भागातील विदयार्थी केंद्रबिंदु ठेवून मी माझी सेवा प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी उपप्राचार्य प्रकाश गवते, प्रा. संजय बागुल,प्रा लतीफ पठाण,प्रा.राजेंद्र जाधव, प्रा.जितेंद्र ठोंबरे, प्रा बबन उदावंत, प्रा. विकास शिंगणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रा.अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# श्री चिंतेश्वर विद्यालयात मुक्तछंद उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ मे**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात *मुक्तछंद उन्हाळी शिबीराचे* उद्धाटन आज श्री अनिल बोर्डे यांच्या हस्ते संपन्न झाले.प्रसंगी व्यासपीठावर स्थानिक समन्वय समिती कार्यवाह श्री दत्तात्रय पत्की,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री अक्षय कुलकर्णी शिशुवाटिका प्रमुख श्रीम.धनश्री ताई पत्की प्राथमिक मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी माध्यमिक मुख्याध्यापक श्री अमोल गोरकर शिबिर प्रमुख श्रीम.राधा माने यांची उपस्थिती होती.



विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमासोबत सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने श्री चिंतेश्वर विद्यालय गेवराई येथे दिनांक २ मे ६ मे या कालावधीमध्ये मुक्तछंद उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये सूर्यनमस्कार, योगा,ध्यान,स्व-संरक्षण, मेहंदी,रांगोळी, आर्ट अँड क्रॉफ्ट नृत्य,पपेट शो,दिर्घकथा,श्रीमद् भगवत गीता १५ वा अध्याय पाठांतर,झुंबा डान्स इ.विविध कौशल्यपूर्ण घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी या उद्देशाने सदरील शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.मुक्तछंद शिबिराच्या आजच्या प्रथम दिनी शिबिरास भा.शि.प्र.संस्था कार्यवाह डॉ.श्री.हेमंत वैद्य,अर्थ समिती अध्यक्ष श्री नितीन डोळे,सुदर्शन गुळजकर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्राच्या विकासात वीज निर्मिती केंद्राच्या कर्मचाऱ्यांचेही मोठे योगदान - महेश महाजन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२ मे**

परळी येथे कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित दिनांक १ मे महाराष्ट्र दिनी कार्यक्रमात बोलताना प्रभारी मुख्य अभियंता महेश महाजन ध्वजारोहणानंतर बोलतांना म्हणाले की, महाराष्ट्राच्या विकासात औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील कर्मचाऱ्यांचे हे मोठे योगदान आहे. शाश्वत विकासासाठी वीज निर्मिती अत्यंत महत्त्वाची आहे. त्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कार्य तत्परतेने पार पाडावे असे आव्हानही केले.



या कार्यक्रमास अधीक्षक अभियंता एस. एन. बुकतारे, प्रसन्नकुमार गरुड,धनंजय कोकाटे, राजीव रेड्डी, सुरेश गर्जे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे,महादेव वंजारे ,सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरने , सुरक्षा विभागाचे प्रमुख बी आर अंबड , कार्यकारी अभियंता मदन पवार, अरुण गित्ते,रत्नाकर देवांग, संदीप बारगजे, व्यंकटराव रामोड, के एच गित्ते मॅडम आदी प्रमुख उपस्थिती होते.

# श्री खोलेश्वर प्रा विद्यालयात महाराष्ट्र दिना निमित्त ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ मे**

१ मे २०२५ महाराष्ट्र दिन व कामगार दिन हा दिवस मराठी अस्मितेचा, शौर्याचा आणि एकतेचा उत्सव म्हणून सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अंबाजोगाई येथील श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयात या दिनानिमित्त ध्वजारोहण सकाळी ठीक ७:५०वाजता विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी विशेष उपस्थिती शालेय समितीचे अध्यक्ष उन्मेष दादा मातेकर, विभाग प्रमुख श्रीधर चौरे, कार्यालय प्रमुख राजेभाऊ नांदगावकर, पालक प्रतिनिधी ज्ञानोबा आंबुरे, इ. मान्यवर तसेच माता पालक व पुरुष पालक उपस्थित होते. महाराष्ट्र दिन व कामगार दिना विषयी माहिती कीर्ती तुपकर यांनी सांगितली. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या निकालपत्रकाचे वाटप करण्यात आले. इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी सोनल कांबळे व शाळेचे सेवक प्रसाद कुलथे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सोनल या विद्यार्थिनीने शाळेच्या ग्रंथालयास शेतकऱ्याचा आसूड हे पुस्तक भेट दिले. शिवाजीराव हेंडगे सर यांनी सुट्ट्या मध्ये दररोज वाचन करावे असा संकल्प विद्यार्थ्यास करावयास लावला. उन्मेष मातेकर सर यांनी विद्यार्थ्यांना या दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश चव्हाण यांनी केले. शेवटी वंदे मातरम या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तायक्वांदो अकॅडमी अंबाजोगाई चा प्रमाणपत्र व बेल्ट वितरण कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ मे**

तायक्वांदो अकॅडमी अंबाजोगाई व किंग्ज फिटनेस सेंटर जिम आयोजित तायक्वांदो प्रमाणपत्र व बेल्ट वितरण कार्यक्रम येथील मोहन टॉकीज कॅम्पस मध्ये संपन्न झाला.



याप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक तथा ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक रमणजी सोनवळकर सर, ज्ञानेश मातेकर, सतीश बलुतकर, भाग्यश्री खोसे, किंग फिटनेस सेंटरचे संचालक गिरीश हजारी व कृष्णा पुजारी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना तायक्वांदो प्रमाणपत्र व बेल्ट वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सदर तायक्वांदो स्पर्धा अकॅडमीच्या वतीने २३ फेब्रुवारी २०२५ रोजी अंबाजोगाईत संपन्न झाल्या होत्या असे अकॅडमी चे संचालक बालाजी कराड यांनी यावेळी बोलताना सांगितले. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमास शहरातील विद्यार्थी, पालक, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुलासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा सेल्फ सर्व्हे करून नोंदणी करा - गोविंद ससाणे,मिनाज पठाण

### १५ मे पर्यंत मुदत वाढ जास्तीत जास्त लाभार्थी यांनी लाभ घ्यावा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ मे**

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सद्या सर्व्हे सुरु आहे. सोनिजवळा येथील नागरिकांनी सद्या सुरु असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन गोविंद ससाणे,मिनाज पठाण यांनी केले आहे.





पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सोनिजवळा येथे सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी सेल्फ सर्व्हे करण्यासाठी २०२४ aawas plus हे शासनाचे अधिकृत ॲप प्ले स्टोअर्सवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टोल करावे, नंतर aadhar Face rd देखील इंस्टॉल करून घ्यावे. त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून ॲपवर विचारलेली माहिती भरुन शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा याचा फोटो अपलोड करावा. आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी आर .के.चवरे , किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करु शकता. एक ते दहा निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी १५ मे ही शेवटची तारीख असून त्या अगोदर सोनिजवळा येथील नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन गोविंद ससाणे,मिनाज पठाण, देविदास जोगदंड, जब्बार शेख, कल्याण पवार, महादेव वसेकर, प्रताप वैरागे प्रकाश जोगदंड यांनी केले आहे

१) सोनिजवळा येथील नागरिकांनी १५ मे ही घरकुल सर्व्हे साठी तारीख वाढली जरी आसली तरी घरकुल लाभार्थी यांनी १० मे पर्यंत आप आपल्याला घराचे सर्व्हे करुन घ्या कारण सर्व्हर डाऊन झाले म्हणून घरकुल लाभा पासुन एकही लाभार्थी वंचित रहाणार नाहीत याची काळजी घेऊन सर्व्हे करा ग्रामसेवक चवरे हे २४ तास सर्व्हे साठी उपलब्ध असणार आहेत त्या मुळे कोणीही वंचित राहणार नाही जर कोणाला कांही अडचण आली तर गोविंद ससाणे ९९४१०१५१५१,व मिनाज पठाण ९१४६९२१९२१यांच्याशी संपर्क साधावा

आसे आवाहन गोविंद ससाणे व मिनाज पठाण यांनी केले आहे.

# जन शिक्षण संस्थान बीड मध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ मे**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकारच्या जन शिक्षण संस्थान बीड द्वारा दि १ मे २०२५ रोजी जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री गंगाधर देशमुख होते तर प्रमुख मार्गदर्शक जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी श्री डी. व्ही. फताटे सर होते. आपल्या मार्गदर्शनात श्री फताटे यांनी जन शिक्षण संस्थान बीड द्वारा प्रशिक्षण घेतल्यानंतर जिल्हा उद्योग व खादी ग्रामोद्योग मंडळ अंतर्गत शासनाच्या विविध योजनेअंतर्गत अर्थसाह्य घेऊन उद्योग उभारता येतो. त्यामध्ये पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना तसेच प्रधानमंत्री मुद्रा योजना या योजनेअंतर्गत कर्ज प्रकरण करण्यासाठी लाभार्थ्यांची पात्रता व त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र इत्यादी विषयी सविस्तर माहिती देऊन कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांनी मिळालेला पैसा संबंधित उद्योगांमध्येच गुंतवून स्वतः स्वावलंबी होऊन इतरांना प्रेरित करण्याचा सल्ला दिला. जन शिक्षण संस्थान बीड मधुन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या किमान ५०० च्यावर लाभार्थींना या वर्षी कर्ज देण्याचे नियोजन आहे. सेवा योजनेसाठी १ ते २० लाखपर्यंत कर्ज मिळू शकते.उत्पादन उद्योगासाठी १ ते ५० लाखपर्यंत कर्ज सुविधा असल्याचे ते म्हणाले. तसेच जन शिक्षण संस्थान बीड द्वारा दर्जेदार प्रशिक्षण दिले जात असून याचा सर्वांनी फायदा घेवुन कर्ज प्रकरणासाठी जिल्हा व खादी उद्योग मंडळाकडे अर्ज करण्याचे आवाहन केले.




याच कार्यक्रमात जन शिक्षण संस्थान बीड द्वारा घेतलेल्या विविध प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले कामगार दिनाचे औचित्य साधुन उसतोड व बांधकाम कामगारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जन शिक्षण संस्थांनचे संचालक श्री गंगाधर देशमुख यांनी केले तर आभार कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मणूरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहायक कार्यक्रम अधिकारी श्री धर्मराज जाडकर यांनी केले.

# मुलींच्या संरक्षणाबाबतची मनातील भिती दुर होण्याचे काम शिबीरातून होईल-आ. नमिता मुंदडा



### महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ मे**

कुठल्याही पालकाच्या मनात मुलींच्या संरक्षणा साठीची भिती असते ही भिती दुर करण्याचे काम अशा शिबीराच्या माध्यमातून निश्चित होईल आणि त्या आत्मनिर्भर बनतील असे मत केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी व्यक्त केले. त्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आणि श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते व्यासपीठावर सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक आर. व्ही. सोनवळकर, लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला, प्राचार्य डॉ. एम.व्ही.कानेटकर, मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी आदीची उपस्थिती होती

पुढे बोलताना आ.मुंदडा म्हणाल्या की, योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गतच्या या शिबीरासाठी मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात असून समाजभान जागृत होण्यासाठी आणि इथे शिकलेल्या गोष्टींचा भविष्यात वापर करण्यासाठी या शिबीराची सुरुवात झाल्याचे सांगून किशोरवयीन मुलांसाठीही एखादे शिबीर सुरू करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रूक्साना मुल्ला म्हणाल्या की, सोळा वर्षाचे वय म्हणजे आत्मभान येण्याचे वय असून पुढे मला माणुस म्हणून मला कसे जगता येईल,माझा विकास कसा होईल असा विचार अंगी रूजावा समाजामध्ये स्वतःची ओळख निर्माण होण्यासाठी काही तरी करावे लागते या साठी अशा शिबीराची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले व भारतीय संविधानातील मानवी मुल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा दिली.

मुलींनी स्वतःमधील क्षमता ओळखून या क्षमतांचा पुरेपूर वापर केला पाहीजे शिवाय आयुष्यात सकारात्मक बदल करावा असे आवाहन अध्यक्षीय समारोपात बर्दापूरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक समन्वयक प्रा.डॉ.प्रविण भोसले यांनी केले.संचालन प्रा.सचिन कऱ्हाड यांनी तर उपस्थितांचे आभार शिबीर प्रमुख डॉ.सारिका जगताप यांनी मानले.यावेळी सल्लागार एन.के.गोळेगांवकर शिबीर समन्वयक ॲड.कल्याणी विर्धे आदीसह संस्थेचे पदाधिकारी,संचालक, सर्व विभागातील कर्मचारी,शिबिरातील विद्यार्थिनी,उपस्थित होते.

# श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिना निमित्त विजयराव चाटूपळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ मे**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय गेवराई येथे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून भा.शि.प्र. संस्था अंबाजोगाई केंद्रीय कार्यकारणी सदस्य श्री विजयराव चाटूपळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष श्री प्रमोद कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ.राधेश्याम झंवर,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री अक्षय कुलकर्णी,शिशुवाटिका प्रमुख श्रीमती धनश्री ताई पत्की श्री अनिल बोर्डे,श्री सुदर्शन गुळजकर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी माध्यमिक मुख्याध्यापक श्री अमोल गोरकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे पद्य गायन श्रीम.विद्या घिगे यांनी केले तर श्री प्रदीप जोशी यांनी आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश मांडला. श्री विजयराव चाटूपळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस म्हणजे त्यांच्या प्रगतीचा आढावा पाहण्याचा दिवस असतो.त्याचबरोबर शिक्षकांसाठी देखील स्वतःच्या सिंहावलोकनाचा दिवस असतो असे सांगितले.प्रसंगी श्री अनिल बोर्डे यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास अंगी बाळगून नवीन कला गुणासाठी सतत प्रयत्नशील असावे व शाळेतील संस्कारक्षम विद्यार्थी बनण्याचा प्रयत्न करावा ही अपेक्षा व्यक्त करत कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री उदय देशमुख यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.